म.ग्रं.सं. ठाणे
विषय : ...
अ. क्र. : १५८२

१५८२

# अमृतमेघ



REFBK-0013733

# अमृतमेघ



दलाल आर्ट स्टूडिओ प्रकाशन

निबंध
३८८९०
निबंध.
१०।८।६५
स.शा.
१५८२.




REFBK-0013733

# अ ⋆ मृ ⋆ त ⋆ मे ⋆ घ ⋆

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ३८८९० वि: निबंध
क्रमांक १५८२ नों दि: १०।८।६५

प्रकाशक :
**दीनानाथ दलाल**
दलाल आर्ट स्टूडिओ
४२, केनेडी ब्रिज, मुंबई ४
●
एकमेव विक्रेते :
**अ. अं. कुलकर्णी**
कॉन्टिनेण्टल प्रकाशन
टिळक रोड, पुणें २
●
प्रकाशन दिनांक :
प्रजासत्ताक दिन – १९६४
●
सर्व हक्क प्रकाशकाधीन
मूल्य : रु. ६/–
●
मुद्रक :
मा. ह. पटवर्धन
**संगम प्रेस प्रा. लि.,**
३८३, नारायण पेठ, पुणें २

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38890 विः
क्रमांक 9482 नों दि



# अंतरंग

११ रंगीत कलाकृति : दीनानाथ दलाल
चित्रांवरील भाष्य : आ नं द सा ध ले

- कालिदास □ भास □ शूद्रक □ भारवी
- भवभूति □ बाण □ विशाखदत्त
- भट्टनारायण □ जयदेव □ जगन्नाथ
- माघ □ श्रीहर्ष □ इति अलम्

## प्रकट आभार


'दीपावली' मासिकांतून भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविणारी ही लेखमाला 'भारतीय कवि-कुल-भूषण' या नावाने प्रथम प्रसिद्ध झाली, आणि रसिकांना ती अत्यंत आवडली. अनेकांनी पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्याविषयी आस्थेने सुचविले. त्यामुळेच 'अमृतमेघ' या नावाने हे आमचे या मालिकेतील ३ रे प्रकाशन प्रसिद्ध करण्यास आनंद वाटतो. श्री. आनंद साधले यांनी मोठ्या आत्मीयतेने रंगून या विषयावर लिहिले. चित्रांचे ठसे श्री. मोहनराव कामत यांनी केले व रंगीत छपाई श्री. मालपेकर, आशा प्रिंटरी यांनी केली. पुस्तकाची छपाई 'संगम'चे श्री. मधुकरराव पटवर्धन यांनी सुबक केली. श्री. मधुकर कोसारे हे आमचे यातले सहकारी. या सर्वांच्या सहकार्याबद्दल मनःपूर्वक धन्यवाद !

— प्रकाशक


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम 38890 वि:
क्रमांक 9482 नों दि

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे
93433



कीं हे अमृताचे मेघ बोलले । की हे नवरसांचे ओघ लोटले ।
नाना सुखांचें उचबंळलें । सरोवर हें ।।
कीं हीं विवेकनिधींचीं भांडारे । प्रकट जाहाली मनुष्याकारें ।
नाना वस्तुंचेनि विचारें । कोंदाटिले हे ।।
कीं हीं सुखाचीं तारवें लोटलीं । अक्षय आनंदें उतटलीं ।
विश्वजनांसी उपयोगा आलीं । नाना प्रयोगाकारणें ।।

--श्रीसमर्थ रामदासस्वामी



# कालिदास

## कविता कामिनीचा विलास

**ज्ञातास्वादो विवृतजघनां को विहातुं समर्थः ।**

कालिदास हा प्रतिभाकामिनीचा कान्त होय. प्रतिभेसारख्या बुद्धिमती, रूपमती, गुणवती अशा मानिनी कामिनीने वरलेला हा कान्त कसा असावा बरे ? त्याचे अगदी मोजक्याच दोन शब्दात वर्णन करावयाचे तर तो रसिक आणि रंगेल असावा. कमनीय कामिनींनी अंगाला उटण्याचे मर्दन केल्याशिवाय त्याने कधी स्नान केले नसावे. स्नानाचे पाणी हे सुद्धा पुष्पादिकांनी सुगंधित केलेले आणि सुखोष्ण असेच हवे. त्याचा अभिषेकही कोमल करांनीच व्हावयास हवा. स्नानानंतर कुणीतरी एक तन्वी शामा त्याचे अंग पुसावयास हवी व झुळझुळीत रेशमी वस्त्राच्या चुण्या करून दुसरी समोर उभी हवी. नुसते केस विंचरावयाचे तर त्यातच केवढा चोखंदळपणा, केवढा सोपस्कार ! कपाळावर चंदनाचा नाम रेखावयाचा त्यात केशर कस्तुरी मिसळलेली हवीच. ते चंदन उगाळले पाहिजे सुद्धा कमलनालांसारख्या मृदुमवाळ करांनी.

असा हा रंगेल आणि रसिक कवी कान्त म्हणून कविताकामिनीने निवडला त्याला आणखीही एक कारण झाले. ते असे की, स्त्रीहृदयाचे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप
अनुक्रम 38870 दि:
क्रमांक 1482 दि:



मेघदूत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३८८७० वि.
क्रमांक १५८२ वौ. वि.



# कालिदास

दलाल आर्ट स्टुडिओ प्रकाशन

रहस्य काय, तिच्या मुग्धतेची कळी कशी फुलवावी आणि मग तिला कशी झुलवावी, हे त्यानेच यथार्थ ओळखले. स्त्रीला भीती वाटण्यासाठी तिच्या अंगावर उन्मत्त हत्ती घालण्याचा व्यर्थ खटाटोप त्याने केला नाही. तर तिच्या लालचुटुक ओठांच्या सुगंधावर मोहित झालेला एक साधा भुंगा त्याने योजिला. त्याचे हे कौशल्य रुचल्यामुळे वनज्योत्स्नेच्या कुंजातल्या हळुवार हिरवळीतील एक अंकुरसुद्धा चुरगाळिला जाण्याच्या अगोदर त्याला प्रतिभा कामिनी वश झाली. आडदांड रणतांडव करून पराक्रम दाखविण्याची त्याला जरूरच पडली नाही. दृष्टीची एक सूचक हालचाल, लाडका एकच शब्द, इतकेच पुरे झाले.

असा हा कुशल विलासी कान्त आणि प्रतिभा कामिनी यांचे मीलन झाल्यावर मूर्तिमंत स्वर्ग उभा राहिला. त्याच्या ओझरत्या दर्शनाने मोठमोठे मान्यवर रसिक वेडावून गेले. कुणी म्हणाले, 'शृंगार वर्णावा तर कालिदासानेच;' कुणी म्हणाले, 'पृथ्वीवरच स्वर्गसुख भोगावयाचे असेल तर यौवनाच्या मादक नवाळीत, कोमलांगी युवतीच्या सहवासात, शरद् पौर्णिमेच्या रात्री, कालिदासाचा विलास पाहावा. कुणी म्हणाले, 'स्वर्ग आणि पृथ्वी यांचे मधुर मीलन कुठे घडत असेल तर ते इथे—कालिदासाच्या शृंगारात' आणि असे वेडावून जाणारे हे रसिक आपुलकीने आंधळे झालेले आप्तजनच नव्हेत, तर ज्यांना कालिदासाच्या भाषेचा आणि संस्कारांचा गंधही नाही असे परकीयही.

कालिदासाचे हे यश अशा रीतीने स्थलकालातीत. म्हणूनच जणू काय तो जन्मला केव्हा आणि कोठे याची निश्चित माहिती नाही. परंपरेने संवतकर्त्या विक्रमाच्या दरबारांतील नवरत्नांपैकी एक, म्हणून कालिदास उज्जैन इथे राहत होता असे आपण मानतो. निश्चित माहिती काही नसल्यामुळे त्याच्या जीवनाची रूपरेखा दंतकथांनी रेखाटण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्यातील दोन दंतकथा अशा.

ब्राह्मण कुलात जन्मलेला हा मुलगा अगदी ढ असल्याने त्याच्या कपाळी गुराख्याचे काम आले. हे काम करीत असता एके दिवशी तो रिकामा उद्योग म्हणून वृक्षाच्या एका फांदीवर बसून तीच फांदी मुळातून तोडीत होता. ही त्याची अचाट बुद्धिमत्ता योगायोगाने त्या राज्याच्या प्रधानाच्या नजरेस

आली. या प्रधानाचा राजकन्येने अपमान केलेला असल्यामुळे त्याला तिचा सूड घ्यावयाचा होता. तो सूड त्याने राजकन्येचे या गुराख्याशी लग्न लावून देऊन घेतला. पुढे एकांतात राजकन्येला सारा प्रकार कळल्यावर तिने आपल्या या अडाणी पतीला झिडकारून दिले. चेतोहर कामिनीच्या रम्य मुख-कमलातून निघालेले धिक्काराचे शब्द त्याला सहन झाले नाहीत. आपला अडाणीपणा घालविण्यासाठी कालीची प्रार्थना करून त्याने ज्ञान संपादन केले. तो कालिदास झाला आणि त्याने आपल्या बुद्धीच्या तेजाने कान्तेचा नखरा उतरविला.

पुढे हा कालिदास आपली शाकुन्तलान्त नाटके आणि रघुवंशान्त काव्ये इत्यादींमुळे विख्यात झाल्यावर लंकेचा राजा कुमारदास याने त्याला भेटीस बोलाविले. त्याप्रमाणे लंकेत गेल्यावर या रंगेल माणसाने राज-वाड्यात निवास न करता नगरातील सर्वात रूपवान गणिकेच्या घरीच मुक्काम ठेवला. रात्री शयनात गुजगोष्टी करीत असता ती गणिका त्याला म्हणाली,

—कुमारदास राजाने एक समस्या विचारली आहे.

—कोणती ?

—कमलातून कमल उत्पन्न होते असे ऐकले आहे पण पाहिले नाही.

—हे सुंदरी, मी तर ही गोष्ट इथेच पहात आहे. तुझ्या या सुंदर मुख-कमलावर ही दोन नयनकमले उमललेली नाहीत काय ?

कालिदासाने दिलेले हे समस्येचे उत्तर ऐकून त्या गणिकेचे मन फिरले. कारण राजाने या समस्येला मोठे बक्षिस लावलेले होते. त्या निर्घृण स्त्रीने कामलुब्ध आणि विश्वस्त अशा कालिदासाचा स्वार्थापायी वध केला आणि ते बक्षिस मिळविले.

या असल्या दंतकथा कुठच्याहि ऐतिहासिक कसोटीला उतरत नाहीत. पण दंतकथातसुद्धा कालिदासाचा कवी म्हणून जन्म आणि मृत्यु या दोन्ही घटना सुंदर रमणीच्या हातून घडलेल्या आहेत. ते उगाच नाही. सुंदर रमणी हाच कालिदासाच्या जीवनाचा स्थायीभाव होता. आणि या रमणीची कक्षा अक्षतयौवना नृपकन्येपासून तो पण्यांगना गणिकेपर्यंत पसरली होती.

पण कालिदास रंगेल असला तरी स्त्रैण नव्हता. त्यामुळे शृंगाररसा-


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38890 वि: [illegible]
क्रमांक 9482 नों० वि: [illegible]



भोवती रुंजी घालणारी त्याची प्रतिभा इतर रसांना पारखी झाली नाही. आणि तिला रसिकता आणि सूक्ष्म निरीक्षण यांची जोड लाभल्यामुळे श्रृंगाररसाच्या कक्षेबाहेरही ती अनेक पराक्रम करू शकली. शिशूंच्या अव्यक्तरमणीय अशा बोबड्या बोलांशी ती जेवढ्या समरसतेने रंगली तेवढ्याच समरसतेने शिकाऱ्यास भिऊन पळणाऱ्या हरिणशिशूंच्या मुखातून गळणारे तृणांकुर पाहूनही गुंगली. आदर्श राजसत्ता कशी असावी याचे गगनाला गवसणी घालणारे भव्योदात्त चित्र तिने रघुवंशात निर्माण केले; तसेच महान त्यागाशिवाय प्रचंड सामर्थ्य उदयास येत नाही असा सिद्धान्त कुमारसंभवात उपदेशिला.

हे प्रतिभेचे सामर्थ्यशाली उन्मेष वंदनीय होत. पण या वंदनासाठी मान विनम्र करीत असतानासुद्धा आपण एक गोष्ट विसरू शकत नाही. कालिदासाचा दशरथ, दिग्विजय करताना पृथ्वीसुंदरीच्या पर्वतरूपी नितंबांवर आक्रमण करतो. 'गृहिणी सचिवः सखी मिथः' हे कान्तेचे अव्याजमनोहर आदर्श रूप कल्पिणारा त्याचा अज मृत कान्तेला मांडीवर घेऊन शोक करीत असताही त्याची नजर हत्तीच्या सोंडेप्रमाणे पुष्ट असणाऱ्या तिच्या मांड्यांकडे असते. देवी आणि तपस्विनी अशा पार्वतीच्या अंगावरून दृष्टि फिरतांना कालिदासाची नजर आपला रंगेल धीटपणा विसरत नाही. अत्यंत महत्त्वाच्या कामात गुंतलेला त्याचा मेघ विवृत-जघना स्त्री समोर दिसताच आपले काम विसरला तर ते साहजिकच असते.

श्रृंगारनिरपेक्ष गोष्टीत रंगतानासुद्धा कालिदासाचा एक डोळा श्रृंगारावर असतोच असतो. कारण त्याच्या मनाचा पिंडच श्रृंगारिक आहे. श्रृंगाररस आधीच गोड. त्यात कालिदासाची शब्दयोजना अत्यंत रसाळ, अर्थवाही आणि समुचित असल्याने मूळच्याच सुंदर अशा संस्कृत भाषेला त्याने एक आगळाच विलासी डौल आणलेला आहे. शिवाय त्याचे रचनाकौशल्य रेखीव आहे. त्यामुळे हा श्रृंगारपारंगत रंगेल कवी साहजिकच प्रथमकवी अशी मान्यता पावलेला आहे. उत्तम कवींची मोजदाद करताना त्याच्या नावाने कनिष्ठिका मोडल्यावर दुसरा कवीच शिल्लक न राहिल्याने अनामिका हे नाव सार्थ झालेले आहे. कविता-कामिनीचा विलास ही पदवी त्यामळे त्याला शोभून दिसते.



# भास

## कविता कामिनीचा मुग्ध हास

गुणानाम् वा विशालानां सत्काराणांच नित्यशः
कर्तारः सुलभा लोके विज्ञातारस्तु दुर्लभः ।। – ।

" जातीच्या सुंदरांना काहीही शोभते " हे कालिदासाचे विख्यात वचन 'सर्वं शोभनीयं सुरूपं' या भासाच्या उक्तीवरून त्याला स्फुरले. कालिदासानेही ज्याच्या कल्पना आदराने स्वीकारल्या असा हा भास संस्कृतचा सर्वात ज्येष्ठ नाटककार होय. हा जवळ जवळ महाभारतकार सौतीचा समकालीन असून इसवी सनापूर्वी व कालिदासापूर्वी सुमारे चारशे वर्षे हा त्याचा काल मानला जातो. संस्कृत कविता-कामिनी कालिदासाच्या काली रम्य विलासिनी बनली, आणि मादक शृंगाराने ओथंबलेल्या कलापूर्ण आलापांनी तिने रसिकतेस जादूने गुंगवून टाकले. या विलासिनी रमणीची निरागस मुग्धता आणि रुचिर बाल्य भासाच्या कवितेत दिसून येते.

भास हा नाटककार मोठा दुर्दैवी होय. जीवनधारा ओतून त्याने निर्मिलेली कविता परीक्षणासाठी अग्निकुंडात टाकण्यात आली. कवीच्या निरागस कलेची परीक्षा तिला जाळून घ्यावी असे ज्यांना स्फुरले ते परीक्षक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम........................ विः ..................



" स्वप्नवासवदत्ता "



भास

दलाल आर्ट स्टुडिओ प्रकाशन

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38890 दि. १५ नोव्हें
क्रमांक ९५८२

धन्य होत. कवी भल्या पहाटे थंडीत उठून जलाशयावर गेला असेल; हळू-हळू ढगांवर रंगाचे वैभव उधळीत अरुणोदय झाला असेल; सूर्याच्या कोवळ्या किरणशलाका अवखळपणे धावत आल्या असतील; त्या त्या अनोळखी कवीला बघून लाजल्या असतील; त्यांना लाजून गोंधळलेले बघून कमलिनी झपकन् उमलली असेल; आणि तिने त्या शलाकांस आपल्या परागात लपवून ठेवले असेल; हे बघून कवीची समाधी लागली असेल; आणि त्याच्या हृदयाची कळी उमलून प्रतिभेचा सुगंध काव्यरचनेच्या रूपाने उधळला असेल.........

—आणि या कोमल प्रक्रियेची यत्किंचितही जाणीव नसणाऱ्या कुणी पाषाणाने या काव्यरचनेचे मोल पाहण्यासाठी तिला अग्नीत टाकून दिली. कामिनीचे मोल मापण्यासाठी तिला चाबकाने फोडून काढावे, कुसुमाचा गंध जाणण्यासाठी त्याला हत्तीच्या पायातळी टाकावे, तसाच हा प्रकार. पण या विश्वामधे असेही पाषाण असतात. अशा पाषाणांमुळेच गुणाढ्याला आपल्या विश्वमोहिनी बृहत्कथेचे सहा लक्ष श्लोक जाळावे लागले. अशाच्या-मुळेच वृंदावनात घुमणाऱ्या मुरलीच्या माधुरीशीच जिची तुलना ती आपली गाथा तुकयाला इंद्रायणीत सोडावी लागली. बिचारा कवी अशा प्रसंगी काय करणार? हृदय पिळवटून त्याच्या नेत्रातून संततधार वाहिली म्हणून तिने अग्नी थोडाच विझणार?

भासाची ही दुर्दैवी कविता शेकडो वर्षे लुप्त झाली होती. भास नुसता नामशेष होता. अशा वेळी चमत्कार झाला. नवल आश्चर्य घडले. विठ्ठल-कृपेने गाथा तरंगावी, जगन्नाथाच्या कृपेने पद्मावतीची नेत्रकमले पुन्हा उघडावी, तशी भासाची तेरा नाटके गणपति नावाच्या दाक्षिणात्य महा-पंडिताला १९०५ साली उपलब्ध झाली. आणि सारे साहित्यिक विश्व स्तिमित होऊन गेले. ही सारी नाटके पूर्णावस्थेत नसली तरी भासाचे उत्कृष्ट नाटक स्वप्नवासवदत्त हे पूर्ण नाटकातील एक आहे. सागराने गिळंकृत केलेल्या धनभांडारातील थोडासा अंशही लाटेने बाहेर आल्यावर कृपणास आनंदाचे भरते यावे तसे या साहित्यलाभाने रसिक लोक परमानंदात तल्लीन होऊन गेले. ही नाटके अशी सापडण्याचा चमत्कार घडला हे दुर्दैवी भासाचे आणि आपलेही त्यातल्या त्यात सुदैव.

कालिदास, शूद्रक, भवभूति असे पुढचे मोठमोठे कवी भासाच्या आदर्श आणि कल्पना समोर ठेवताना दिसतात. कवितेच्या ऐन उमेदीत तिचे जे गुण पुढे प्रकर्षाला पावले आणि ज्याच्या मोहिनीने जगातील रसिक वेडावले त्या साऱ्या गुणाचे बाल्यातील मुग्ध स्वरूप भासामध्ये दिसते. पुढच्या कवीचे पृथक गुण भासामध्ये एकत्र दिसतात एवढेच नव्हे तर त्याच्या बाहेरचे गुणही दिसतात. व्यासाच्या महाभारतावर पुढील कवीच्या पिढयान् पिढ्या पोसाव्या तसे भासाच्या नाट्यगुणाचे झाले आहे. त्याच्या नाटकातील माधुरी इतर कवींनी लुटली तरी त्यांना पुरी पडली आहे.

मोजक्याच शब्दामध्ये कोमल भावनांचे विश्व फुलविण्याची भासाची किमया अगाध आहे. "अरे! हा शीलातल सुखोष्ण आहे. माझी प्रिया नुकतीच याच्यावरून उठून गेली असावी." उत्तान अशा शृंगारिक आसक्तीचे हे किती थोडक्यात आणि सोज्ज्वल वर्णन!

पुढे पुढे कवितेचा शृंगार रम्यतर बनत असताच निरर्गलही बनत गेला. त्याच्याशी तुलना करता भासाचा शृंगार अधिक सुसंस्कृत आणि घरंदाज वाटतो. "पद्मावती जरी आपल्या रूपाने आणि गुणाने माझे मनास भुरळ पाडीत असली तरी वासवदत्तेशी (मृत वाटणाऱ्या बायकोचे नाव) भावनिबद्ध झालेले माझे मन ती हरवून घेऊ शकत नाही." असे भासाचा उदयन म्हणतो. आणि हे आडून ऐकणारी पद्मावती मत्सराने जळण्याऐवजी अशी आकांक्षा धरते की हे उदात्त हृदय मीही असेच भावनिबद्ध करून घेईन. हा प्रसंग कालिदासाच्या शृंगाराएवढा मादक नसेल पण तो कामधेनूच्या धारोष्ण दुधासारखा निर्मळ आहे. "गोष्टी बोलता बोलता रात्रच संपली" या भवभूतीच्या पुढच्या उद्गारात जी दांपत्यजीवनाच्या आदर्शाची परमावधी झालेली दिसते तिचीच छटा "गीतवाद्यांनी मला रिझवीत असता ती मधेच थांबून सुहास्य वदनाने माझ्याशी गुजगोष्टी करीत असे." या भासाच्या उद्गारात दिसते. एवढेच नव्हे, एकाच कथानकावर असलेले भासाचे "प्रतिमा" आणि भवभूतीचे "महावीरचरित" ही नाटके पाहिली की काव्यात भासापुढे गेलेला भवभूती नाट्यात भासाच्या मागे असल्याची जाणीव होते. पुढील छोटा संवाद पहा.

सीता:—अवदातिके, हे काय ग तुझ्या हातात?

अव:–महाराज्ञी, याला वल्कल म्हणतात.

सीता:–मग तू ते इकडे कशासाठी आणलेस ?

अव:–नेपथ्यपालिकेची जरा गंमत करण्यासाठी. आता हे तिला दिसले नाही की तिची मोठी धांदल उडेल.

सीता:–इकडे आण जरा गडे. मला नेसून कसे दिसते ते पाहते.


अव:–महाराणी, सौंदर्याला सारे शोभूनच दिसते.

आणि सीता वल्कल नेसते. याच वेळी तिला वल्कल नेसवून वनात धाडणारा प्रसंग इतरत्र घडत असतो. हे नाटच अत्यंत करुणरम्य आहे.

याच प्रतिमा नाटकामध्ये राम वनात गेल्यावर सुमंताच्या मुखात बोलता बोलता " राम लक्ष्मण सीता " असे शब्द येतात. तेव्हा दशरथ त्याला दटावतो. वनातच नव्हे तर शब्दात सुद्धा " राम सीता लक्ष्मण " असे हवे. सीता, शब्दात सुद्धा, त्या दोघांच्या मागे पडली तर त्या सुकुमार अबलेचे रक्षण कोण करील ? एखादा कठोर शब्द लगेच मागोमाग आला तर ? ती सुरक्षित आणि मधेच हवी. दशरथाची सीतेवरील मातृसदृश माया संबंध वाल्मीकीरामायणात जेवढी दिसत नाही तेवढी इथे दिसते.

ही भासाची कला. पुढे प्रकट झालेल्या सर्व उत्तमोत्तम गुणांनी नटलेली भासाची ही कन्या. मुग्धा कविता कामिनी.

—आणि हिचे मोल ठरविण्यासाठी हिला जाळण्यात आले. उगाच नाही भास म्हणतो, " नित्यशः जागोजाग विशाल गुणाचे प्रदर्शन होत असते. ते जाणण्याची पात्रता असणारेच दुर्मिळ असतात."



# शूद्रक


## कविता कामिनीचा परिहास

**स्त्रियोहि नाम खल्वेता निसर्गादेव पंडिताः**
**पुरुषाणां तु पांडित्यं शास्त्रैरेवोपदिश्यते ।।**

ललित साहित्यातील सौंदर्य हे बहुशः पुरुषाला स्त्रीविषयी वाटणाऱ्या प्रणयभावनेच्या छटांवर अधिष्ठित असते. या छटा सुरम्य तर खऱ्याच. पण हाच प्रणय कामिनीला कान्ताबद्दल वाटणारा असेल तर त्याच्या छटांची माधुरी काय वर्णावी ! जलधारांनी अंगे भिजली आहेत अशाही अवस्थेत आपला कान्त चारुदत्त याच्याशी अभिसारिका म्हणून जाऊन त्याला आपल्या आलिंगनाने धन्य करणाऱ्या वसंतसेनेची मृच्छकटिक हीकथा त्यामुळेच संस्कृत साहित्यात आपल्या आगळेपणाने चिरंजीव झालेली आहे.

अभिसारिकेची कथा एवढाच या नाटकाचा आगळेपणा नाही. संस्कृत साहित्य हे जगाच्या साहित्यात मूर्धाभिषिक्त सम्राज्ञीचा मान पावले आहे ही गोष्ट खरी. परंतु सम्राज्ञीचे जीवन पुष्कळदा शिष्टाचारांच्या परंपरांमुळे बंदिवानासारखे होते. वर्तनाचे काटेकोर नियम हे जीवन कारावासाप्रमाणे असह्य करून टाकतात. संस्कृत साहित्याचे असेच झाले आहे. नाटकाला इतकेच अंक अथवा काव्याला इतकेच सर्ग हवेत; त्यांचे नायकनायिका विशिष्ट परिस्थितीतीलच हवेत; त्यात अमूक विषयांची वर्णने

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्र
अनुक्रम.................... दि: ..............
क्रमांक .................... नोंद दि ..............



वसंतसेना



शूद्रक

दलाल आर्ट स्टुडिओ प्रकाशन

ग्रा. क्र. ३३०३३

हवीत; अमुकांची असता कामा नये, असल्या काटेकोर नियमांची चौकट परंपरेने संस्कृत साहित्याभोवती घातलेली आहे. प्रतिभेची भरारी थिटी पडली की हे नियम म्हणजेच साहित्य असे घडून आशयाचे महत्त्व नाहीसे होते. या जाचक नियमांनी बंधने कवितासम्राज्ञी पाळते खरी. पण एखादे वेळी तिलाही यांच्या कचाटयातून सुटून, मनसोक्त क्रीडा करावी, परिहास करावा, खळखळून हसावे, क्षणभर अनिर्बंध व्हावे असे वाटत नसेल काय ? अवश्य वाटत असावे. तिचा असा अनिर्बंध परिहास, मनमोकळी क्रीडा, मृच्छकटिक नाटकात दिसून येते हा त्याचा दुसरा आगळेपणा आहे.

मृच्छकटिकाचा नायक देव अथवा राजा नाही तर एक व्यापारी आहे. त्याची नायिका राणी नसून गणिका आहे. या चाकोरीबाहेरच्या युगुलाच्या प्रणयजीवनाशी, रस्त्यातील मारामाऱ्या, जुगाऱ्यांचे अड्डे, घरफोडया, न्यायालयातील खटले, राज्यक्रांति असे परंपरेबाहेरचे प्रसंग आणि त्यात भाग घेणाऱ्या उच्चनीच थरातील परंपरेबाहेरच्या व्यक्ती, यांचा बेमालूम सांधा जुळवून शूद्रकाने ही आगळी कथांवस्तू निर्माण केलेली आहे. त्यामुळे संस्कृतातील इतर प्रणयकथांपेक्षा ही अधिक जिवंत आणि रसरशीत वाटते. एवढेच नाही तर संस्कृत साहित्याला संपूर्णपणे अपरिचित असा, आजच्या विदग्ध टीकाकारांनाही डोलावयास लावणारा अभिजात विनोद, परंपरेचे ठोकळे झुगारून, या नाटकाच्या जडणीत जोडला गेला आहे. म्हणून या नाटकात संस्कृत कवितेचे दरबारी दर्शन होण्याऐवजी, अंतर्गृहात मनमोकळी परिहासक्रीडा करताना दर्शन होते आणि वेगळाच प्रत्यय येतो.

असा प्रत्यय आणून देणाऱ्या या नाटकाचा कर्ता शूद्रक याची आपणास काहीच निश्चित माहिती नाही. तो शूद्र असावा, जातिवंत कलाकार असला तरी विदग्ध नसावा, आंध्रभृत्य राजघराण्याचा मूळपुरुष शिमुक हाच तो असावा आणि त्याचा काल ख्रिस्तपूर्व एक शतक असावा असे मत पंडित लोक बनवीत होते. तेवढयात भासाच्या नाटकांचा शोध लागून आधीच घोटाळत असलेला हा प्रश्न साफ हाताबाहेर गेला. कारण भासाच्या नाटकातील चारुदत्त हे नाटक जवळजवळ शब्दशः मृच्छकटिकाच्या पहिल्या चार अंकात गोवले गेले असून त्यावरच पुढील सहा अंकांची उभारणी केलेली आहे.

पंडितांचा घोटाळा झाला तरी रसिकांच्या आनंदात उणेपणा यावयास नको. चोराने घर फोडून सर्वस्व नेल्यावरही, घर फोडण्याच्या चोराच्या कुशलतेचे कौतुक करणारा, अव्यवहारी पण गुणी आणि गुणज्ञ चारुदत्त आणि त्याच्या गुणांवर मोहून सर्वस्वाचे दान करणारी गणिका वसंतसेना यांच्या या धीट प्रणयाच्या दर्शनाने मन प्रसन्न आनंदाने मोहून जाते. वसंतसेना गणिका असली तरी ती कुलवधूंनी आदर्श मानावी अशी गुणवती असते. सत्ताधारी राजपुरुषाची प्रीति धुडकावून लावून दरिद्री प्रियकरास जवळ करताना ती म्हणते, "प्रीति गुण पाहते, सत्ता नव्हे. रत्नाचा रत्नाशीच संयोग शोभतो. मला पुरुष हवा तो सेवा करण्यासाठी नव्हे तर प्रीतीचा उपभोग घेण्यासाठी, जीवन जगण्यासाठी हवा. गुण आणि वैभव एकत्र नसावयाचेच. जलाशय दूषित असेल तरच तो नेहमी परिपूर्ण राहणार. उलट मोहर झडून गेला तरी सहकार तरूची छाया सुखदच व्हावयाची." तिच्या जिवंत प्रणयाच्या यथार्थ रूपाची तिला अशी जाणीव आहे, आणि ती बोलून दाखविण्याची धिटाई आहे.

आपल्या अर्थहीनतेच्या जाणिवेने कातर झालेल्या चारुदत्ताला ती सांगते, "न्यास हा मनुष्याच्या विश्वासावर ठेवतात. संपत्तीच्या अथवा घराच्या विश्वासावर नव्हे." गुणज्ञ आणि रसिक चारुदत्ताला वसंतसेनेची किमत कळून चुकते. पण चारुदत्ताच्या हितास जपणारा त्याचा एकनिष्ठ सखा मैत्रेय याला ही गणिका चारुदत्तास लुटील अशी भीती वाटत असते. अभिसारिका म्हणून वसंतसेना चारुदत्ताच्या मिठीत शिरते तेव्हा तो भोळा ब्राह्मण गोंधळून जातो आणि विचारतो, "आज ही इथेच झोपणार आहे काय ?" या त्याच्या प्रश्नाने चारुदत्त आणि वसंतसेना यांनाही हसू आल्याशिवाय राहत नाही. या नाटकातील सारा उच्च विनोद स्वभावावर आधारलेला आहे. जगातील पहिला श्रेष्ठ विनोद हाच होय.

या धीट आणि बेदरकार अभिसाराच्या शृंगारकथेत चारुदत्ताची पत्नी नामशेष होत नाही हे औचित्य तर फारच हृद्य वाटते. वसंतसेनेचे प्रेम हे शकुंतलेच्या प्रेमापेक्षाही काकणभर अधिक जोमदार आणि आत्मार्पण करणारे असले तरी दुष्यंताच्या पूर्वपत्नीप्रमाणे, त्या प्रेमात चारुदत्ताच्या पत्नीची धुळधाण न होता, वसंतसेना समुचित आदराने तिचे मन जिंकून

शेवटी तिची पाठची बहीण बनून जाते. संस्कृतातील इतर शृंगारकथातील प्रणय हा पुष्कळदा प्रणयासाठी केला असावा असे वाटते. त्या उलट मृच्छकटिकातील जीवनदर्शनाच्या व्याप्तीमुळे ती नुसती प्रणयकथाच न राहता जीवनकथा बनून जाते.

मला पुरुषसहवास हा जीवनाचा आनंद लुटण्यासाठी हवा असे म्हणणारी वसंतसेना ही जणू काय नवआनंदाचे सृजन हे आत्मार्पणातून होते, दिव्य भोग हे दिव्य त्यागातून फलित होतात, हे जगूनच दाखवीत आहे.

अशा वृत्तीने अभिसार करणारी ही गणिका शेवटी राजाकडून कुलवधू म्हणून घोषित केली जाते. विसाव्या शतकातील पुरोगामी लेखकाचीही झेप जिथपर्यंत जात नाही तिथपर्यंत शूद्रकाने ही झेप घेतली आहे. गणिकेची कुलवधू बनवून तिला शिरावर घेणाऱ्या शूद्रकाच्या या दृष्टीत किती व्यापक द्रष्टेपणा ओथंबला आहे, याकडे गेल्या दोनहजार वर्षात कोणीहि आवर्जून लक्ष दिलेले नाही. ‘कुल हे दैवाधीन असते’ असे कर्णाने सांगून हजारो वर्षे गेली तरी आपणास ते उमगले नाही; तिथे आपण बिचाऱ्या शूद्रकास थोडेच दाद देणार? आम्ही परंपरेचे गुलाम आहोत. आपली कविता कामिनीही परंपरेतच गुंतलेली आहे. म्हणून तर म्हणायाचे की मृच्छकटिक नाटक ही तिने दरबारी नियमांना झुगारून अनिर्बंधतेच्या क्षणिक उत्स्फूर्तीमध्ये केलेली रम्य क्रीडा आहे, परिहास आहे.

# भारवी

## कविता कामिनीचे तेज

**अमर्षशून्येन जनस्य जन्तुना**
**न जातहार्देन न विद्विषोदरः ।।**

प्रभातेच्या मंगल वेळी प्रातःसंध्या करावयास सरोवरावर आलेला हा ब्राह्मण एकाएकी संध्या करावयाचे विसरून गेलेला आहे. त्याला काव्य स्फुरत आहे. हे पहा पुढ्यातील कमलाच्या पानावरच तो स्फुरलेले काव्य नखाने लिहीत आहे.

**सहसा विदधीत न क्रियाम्**
**अविवेकः परमापदाम् पदम् ।।**

स्फुरले तेवढें काव्य कमलपत्रावर लिहून कवी आपल्या मार्गाने निघून गेला. ते कमलपत्र योगायोगाने राजाच्या हाती पडले आणि त्याने ते गंमत म्हणून आपल्या शय्येसमोर टांगून ठेविले. त्या रात्री राजा शयनमंदिरात आला असता राणीच्या कुशीत एक तरुण पुरुष झोपलेला त्याला दिसला. दोघांचाही शिरच्छेद करण्यासाठी त्याने तलवार उपसली तो हे कमलपत्र त्याला दिसले. त्यावर लिहिले होते. "अविचाराने कोणतीही गोष्ट करू नये." तेव्हा राजाने आपली तलवार म्यान करून राणीला उठविले. त्यावर त्याला कळले की तिच्या कुशीत त्याचाच वीस वर्षे हरवलेला मुलगा झोपला होता.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
क्रमांक........ दि: ........
........ नों दि........

पांचाली



कमलपत्रावरील काव्याने घोर अनर्थ टाळल्यामुळे राजाने त्या काव्याच्या कर्त्यास शोधून काढले व त्याची मानाने आणि धनाने पूजा केली. हा कवी म्हणजेच भारवी. किरातार्जुनीय या विख्यात काव्याचा कर्ता. संस्कृत कवीच्या परंपरेप्रमाणे याच्याही स्थलकालाचे ज्ञान आपणास नाही. पण हा महाराष्ट्रीय कवी सहाव्या शतकात झाला असावा. हा दंडीचा पणजा असून नाशिकजवळ एलिचपूर येथे राहात असावा.

याची विश्वसनीय माहिती मिळत नसली तरी त्याच्या काव्याचा आस्वाद घ्यावयास त्यामुळे मुळीच अडचण पडत नाही. ज्या सूर्याचे तेज आपण पाहतो त्याची प्रचीती घेण्यासाठी आपणास सूर्याच्या इतिहास-भूगोलाची काळजी करावी लागत नाही. भारवीचे असेच आहे. भारवी हा कविता मानिनीचे मूर्तिमंत तेज आहे. ज्वलंत अग्निशिखेप्रमाणे त्याची दीप्ती आहे.

हे तेज भारवीला तपाशिवाय लाभले नसणार. तहान-भूक विसरून उदात्त विचाराच्या चिंतनात हाडांची काडे करावी तेव्हा कुठे अशा तेजाची साधना होते. शिळेवर तर शिळेवर झोपावयाचे. पाला तर पाला खावयाचा. ऊन तर ऊन. थंडी तर थंडी. एक चिंतनाचा तेवढा ध्यास. त्याचीच एक आच लागलेली. भारवीने ज्या आचेने तप केले ती आच वैभवाची नव्हती. कान्तेची नव्हती. शृंगाराची तर नव्हतीच. ती आच दैदीप्यमान पौरुषाची होती. तेजाची होती. आचेने केलेल्या या तपाला तेजाचे फळ मिळाले. अंगोपांगी तेज फाकले. वाणी तेजाळ झाली. सागराच्या अथांग गांभीर्यास लाजविणारे अर्थगांभीर्य इवल्या इवल्या शब्दात साकार झाले. आणि भारवीचे काव्य उदयास आले. किरातार्जुनीयात या तेजाचा आविष्कार जागोजाग झालेला आहे.

मोक्षवृत्तीच्या आड आपला भेकडपणा लपविणाऱ्या नादानांना अक्षरशः लाथ मारण्यासाठी भारवीने हे काव्य लिहिले आहे. कान्तेवर अत्याचार झाला. तरीहि तो शांत बसून पाहणाऱ्या युधिष्ठिर धर्मास प्रणामपूर्वक धिक्कारून, अर्जुनाने कौरवांचा निःपात करण्यासाठी तप-पूर्वक बल संपादन केले हा या काव्याचा विषय आहे. सामाजिक आणि राष्ट्रीय जीवन पौरुषशून्यतेने जगणाऱ्या नेभळ्या लोकांना हे काव्य म्हणजे

महामृत्युंजय मात्रा आहे. अस्थानी निवृत्तीने लोळागोळा झालेल्या समाजात नवचैतन्य आणण्यासाठी भारवीने हे दिव्य अंजन निर्मिले आहे.

या तेजाचा आविष्कार सहस्र धारांनी होतो. अग्निज्वालेप्रमाणे तळपणारी तेजस्विनी द्रौपदी या तेजाचे मूलपीठ आहे. ती याज्ञसेनी धर्माच्या शांतीचा धिक्कार करून त्यास म्हणते, "जळो तुमचा मन:संयम आणि आग लागो तुमच्या पौरुषाला. तुमच्या संतोषाचा धिक्कार असो." द्रौपदीचे भाषण पाषाणातही शौर्याचे घुमारे आणणारे आहे. भीम धर्मास म्हणतो, "उत्कर्ष हा पौरुषाच्या आश्रयाने राहातो; रडतरावपणाच्या आश्रयाने नव्हे." द्रौपदी आणि भीम दोघे अपमानाने जळून धर्माची निर्भर्त्सना वारंवार करीत असतातच; पण भारवीचा तपोबल व्यासही धर्मास म्हणतो, "साम्राज्य सद्‌गुणांनी मिळत नाही तर पौरुषानेच मिळते !"

धर्माचे सारे शांतिपाठ धिक्कारून अर्जुन पौरुषाची कास धरतो. भारवीने पौरुषाचा गौरव इतका दाखविला आहे, की मूळ भारतातील अर्जुन किरातरूपी शंकराला शरण जाऊन त्याला प्रसन्न करून घेतो; तर भारवीचा अर्जुन शंकराला भूमीवर आपटण्यासाठी पायाला धरून उचलू पाहतो; आणि त्या बलदर्शनाने शंकर प्रसन्न होतो. शंकरभक्तांस हे कदाचित् रुचणार नाही. पण पौरुषाची आराधना करणारांनी हा आदर्श विसरून चालावयाचे नाही.

महत्त्वाच्या कामासाठी जाताना वाटेत सुंदरी भेटली तर तिच्या सहवासात एखादा क्षण मोडावयास हरकत नाही हे कालिदासाचे मत भारवीला मान्य नाही. त्यामुळे अर्जुन हा ज्ञातास्वाद असूनही समोर येणाऱ्या विवृतजघना अप्सरांकडे बिलकूल लक्ष देत नाही.

याचा अर्थ भारवीला शृंगार अपरिचित होता असे मुळीच नव्हे. पण शृंगार हा जीवनाचा स्थायीभाव नसून तो केवळ जीवनाला रुची आणण्यासाठी मिठाप्रमाणे वापरावयाचा. तेजाळ पराक्रम हाच जीवनाचा स्थायीभाव. हा लवणाएवढा शृंगार किती रुचिर होतो हे काय सांगावे ? आपल्याच सुखासाठी अर्जुन दूर जावयास निघाला तेव्हा द्रौपदीस शोक आवरेना. नेत्र अश्रूंनी ओलावून दवस्नात कमलाप्रमाणे दिसू लागले.

अर्जुनाकडे तिला एक प्रेमपूर्ण कटाक्ष टाकावयाचा होता. पण दुष्ट अश्रूंनी पटल निर्माण केल्यामुळे तिला तसे करता येईना. बरे, अश्रू गाळून दृष्टी मोकळी करावी तर मंगलप्रसंगी रडणे अनुचित. म्हणून तिचा मोठा कोंडमारा झाला. एवढाच शृंगार. पण काय त्याची माधुरी ! कालिदासाने वर्णिलेला शृंगार वाचून मनाला कितीही आनंदाच्या उकळ्या फुटल्या तरी भारवीचा हा शृंगार वाचून मन ज्या पातळीवर जाते ती पातळी कालिदास गाठू शकत नाही.

भारवीचे काव्य वाचले की त्याची मूर्ती समोर साकार होते. देह तपो-दंडाने सुकून गेला आहे. दाढी जटा वाढलेल्या आहेत. थंड पाण्याच्या आंघोळीने त्वचा सुरकुतली आहे. धुळीचे पुट अंगावर चढले आहे. कसले तरी वस्त्र कसे तरी लज्जारक्षण करीत आहे. स्वारी आपल्याच चिंतनात कुठेतरी चाललेली आहे. आणि ते डोळे !

–त्यात सारी जीवननिष्ठा प्रखर तेजोरूपाने सळसळत आहे. जणू रवीची भा त्या नेत्रातून जगाला भारून टाकत आहे, म्हणून तो भारवी.

फक्त एकच वाईट वाटते. विश्वाचे स्वरूप पालटून टाकण्याचे सामर्थ्य एका अणूत असते. पण ते कष्टसाध्य असते. शब्दाशब्दात भरलेले भारवीचे अर्थगांभीर्य तसेच कष्टसाध्य झालेले आहे. द्राक्षाच्या रसाप्रमाणे ते चटकन् जिभेवर ओघळत नाही, तर नारळाप्रमाणे सोलून, फोडून, किसून काढावे लागते. त्यामुळे भारवीच्या कवितेला मल्लीनाथ नारीकेलपाक म्हणतो.

'प्राप्त कर्मापुढे मला मोक्षाची फिकीर नाही. कर्मयोग हाच माझा मोक्ष आहे.' असे ठणकावून सांगणारा अर्जुन त्यामुळे आपणाला एक-वारही स्मरत नाही. पण 'ज्याअर्थी ही स्त्री मला हवीशी वाटते त्याअर्थी ती मला मिळावयास अडचण नसावी" असे म्हणणारा दुष्यंत शतवार स्मरतो.



# भवभूति

## कविता कामिनीची करुणा

**अविदितगतयामा रात्रिरेव व्यरंसीत् ।।**

आठव्या शतकातील गोष्ट. शारदेच्या न्यायपीठासमोर एक सोन्याचा नाजुक ताजवा होता. हिऱ्याच्या अत्यंत सूक्ष्म अणीवर तो झुकत असे. त्याच्या एका पारड्यात कालिदासाची कविता ठेवलेली होती. दुसऱ्या पारड्यात एका नवकवीची कविता ठेवण्यात आलेली होती. तरफ उचलण्यात आली तोच नवकवीची कविता हळूहळू वर जाऊ लागली. हे दिसताच कुणाच्या नकळत शारदेने आपल्या हातातील कमळ जरा हलविल्यासारखे केले; आणि त्यातील मधाचा एक सूक्ष्मतुषार नवकवीच्या कवितेवर टाकला, त्याबरोबर दोन्ही पारडी सारखी झाली.

हा नवकवि म्हणजे भवभूति होय.

कालिदासाला काव्यात ज्याप्रमाणे भारवी टक्कर देऊन राहिला आहे, त्याप्रमाणे नाटकात त्याला भवभूतीने तोडीस तोड दिली आहे. भवभूतीचे उत्तररामचरित नाटक श्रेष्ठ काव्य होय की कालिदासाचे शाकुंतल, हा वादविषय अजूनही अनिर्णीत आहे. या वादाचा जो निर्णय शारदेने वरील दंतकथेत दिला तो वास्तविक मान्य व्हावयास हरकत नसावी.

मोहक अर्थवाही शब्दांची मधुर रचना करण्यात कालिदासाचा हात

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ३८८९० दि: ७ नियांक
क्रमांक ९५० नों. दि:



भूमिकन्या

३८८३०
९५४२



# भवभूती

दलाल आर्ट स्टुडिओ प्रकाशन

कोणीहि धरू शकत नाही. त्यामुळे त्याच्याशी तोडीस तोड ठरणाऱ्या कवीतसुद्धा मधाचा एक कण तरी कमी पडतोच. माधुरीची ही गोष्ट सोडून दिली तर आशयघनतेच्या बाबतीत भवभूति अग्रगण्य आहे.

भवभूतीची महावीरचरित, मालतीमाधव आणि उत्तररामचरित अशी तीन नाटके उपलब्ध आहेत. महावीरचरित या नाटकात रामचरित्रातील लंकाविजयापर्यंतचा कथाभाग आला आहे. मालती–माधवाचे कथानक स्वतंत्र आहे. उत्तररामचरित नाटकात वाल्मीकीरामायणाच्या उत्तर कांडातील कथानक आहे.

भवभूतीच्या कालापर्यंत संस्कृत नाट्यकला ही राजाश्रयाने राहात होती. भवभूतीच्या काली ती अधिक लोकाभिमूख होऊन समाजाच्या अधिक विस्तृत थरात प्रसार पावली असावी असे संशोधकांचे मत आहे. आज ज्ञात असलेले भास, कालिदास, शूद्रक हे थोर आद्य नाटककार तर भवभूतीच्या काली ज्ञात असणारच, पण आज कालौघात गडप झालेले दुसरेही काही नाटककार तेव्हा ज्ञात असणे संभवनीय आहे. या नाटककारांच्या तुलनेने नवोदित भवभूतीचा अधिक्षेप तेव्हांच्या अहंमन्य टीकाकाराकडून करण्यात आला तेव्हा आत्मविश्वासाने ओतप्रोत भरलेल्या भवभूतीने त्यांना खणखणीत उत्तर दिले आहे.

आपल्या मालतीमाधव नाटकात तो म्हणतो,

"जे दुढ्ढाचार्य माझी अवज्ञा करावयास प्रवृत्त झाले आहेत त्या दीड शहाण्यांसाठी माझ्या कलेचा जन्म नाही. हे जग विशाल आहे आणि काल निरवधी आहे. आज नसेल तर पुढे कधी तरी मला समानधर्म असा रसिक उत्पन्न होईलच. त्याच्यासाठी माझ्या कलेचा जन्म आहे."

अशा जिद्दीने भवभूतीने नाट्यरचना केली आणि संस्कृत शारदेच्या भव्य मंदिरात आपणासाठी बहुमानाचे स्थान हक्काने कोरून काढले. कालिदासासारख्यांचे आसनही डळमळीत झाले असे क्षणभर वाटावे इथवर पराक्रम करून दाखविला. पौरुषाचा गौरव करणारे कर्णाचे विख्यात उद्गार जसे दलितांना वेदमंत्रांप्रमाणे आधार झालेले आहेत तसेच भवभूतीचे वरील उद्गार उपेक्षित नवोदितांना आत्मविश्वासाचे बळ देण्यास युगेयुगे समर्थ ठरले आहेत.

उत्तररामचरित हे नाटक भवभूतीच्या नाट्यमालेतील कौस्तुभमणी होय. नाट्यरचना या दृष्टीने रामचरित हा विषय अतिभव्य असल्याने रचनेत तो नीट आवरता आला नाही तरी काव्य या दृष्टीने त्याची माधुरी केवळ निरतिशय आहे.

राम आणि सीता यांचे आदर्श दांपत्यजीवन हा काव्याचा विषय. राम-सीतेच्या एकत्र जीवनाचे वर्णन करताना भवभूती अर्ध्याच श्लोकामध्ये या दांपत्यजीवनाचे भव्योदात्त चित्र उभे करतो. रामसीता गुजगोष्टी बोलत असता रात्रच संपून गेली ( पण गोष्टी संपल्या नाहीत ) हा तो श्लोकार्ध. यामधे दांपत्यजीवनातील मनोमीलनाचे जे हृद्य चित्र दिसून येते ते संस्कृत साहित्यात जवळ जवळ दुर्मिळ आहे.

अर्थात इतकी मने जुळलेल्या दंपतीमध्ये विरह घडणे शक्य तरी आहे काय ? पण अशक्य दिसणारा हा विरह परिस्थितीने रामसीतेमध्ये घडवून आणला. कान्तेविषयीचे प्रेम आणि राजाचे कर्तव्य या दोन उदात्त भूमि-कातील प्राणांतक संघर्ष इतक्या कुशलतेने चित्रित केलेला जगाच्या वाङ्मयात कुठेही सापडणार नाही. सीतेस अन्याय झाला असे मानणारे स्त्रियांचे कैवारीसुद्धा या अन्यायाबद्दल रामाला यत्किंचितही दोष देऊ शकत नाहीत. उलट सहृदय मनात सीतेपेक्षा रामाविषयीच अनुकंपा आणि सहानुभूती वाटावी अशी किमया या कुशलतेत आहे. कायमचा विरह झाला असताही आणि त्या विरहाने हृदय फुटत असताही विरह झालाच नाही, उलट राम आणि सीता हे सावलीप्रमाणे एकमेकांच्या कायमचे जवळच आहेत असा भ्रम व्हावा अशीही किमया या कुशलतेत आहे.

ही अनुपम किमया भवभूतीने ज्या सामर्थ्याच्या जोरावर साध्य केली ते सामर्थ्य कशाचे बरे ? विमल हृदयाला पीळ पडून निघालेल्या एका निरागस अश्रूंचे हे सामर्थ्य आहे. अश्रु इतका सामर्थ्यवान असू शकेल ? अवश्य ! अवश्य ! रामसीतेच्या अश्रूंमुळे सारे त्रिभुवन रडू लागते. वृक्ष रडतात; पाषाण रडतात; पर्वत रडतात; नद्या रडतात; पुलिने रडतात; पशू रडतात; पक्षी रडतात; सारे चराचर विश्व रडते. हे अश्रु भेकडाचे असते तर त्यांना कोणी विचारले नसते. पण हे अश्रु समर्थांचे आहेत. सारे भुवन ढवळून टाकण्याचे सामर्थ्य त्या अश्रूंमध्ये आहे. या अश्रूंस दांभिक

शिष्टाचारांचा बंद घालावयाचा प्रयत्न न करता मोकळ्या निरागस भावनेने त्याला वाट करून दिलेली आहे. हे अश्रू किती ? एक ? दोन ? छे, अश्रूंची संततधार. या पवित्र धारेची जणू नदी होऊन ती गोदावरी रूपाने अजून वाहत आहे.

नाइलाज म्हणून पतीला पत्नीचा त्याग करावा लागला तरी त्या त्यागातून मनाची जवळीक आणि अतूट एकता यांचे जे परम रमणीय चित्र या अश्रूंच्या बिंदुबिंदूतून शतरंगांनी परावर्तित होते, त्याच्या सहस्रांशही एकता दांपत्यजीवनात लाभली तर ते दांपत्य जीवनसुखाच्या शिखरावर आहेसे वाटावे इतके हे चित्र भव्य आहे. या एकतेच्या महान चित्रामध्ये शारीरिक हीन वासनेची एकही थिल्लर छटा नाही हे पाहिले की रामसीता वंद्य का झाली याचे इंगित कळून येते.

भवभूतीने या ठिकाणी करुणरस मूर्त केला आहे. साऱ्या विश्वाला धुवून पवित्र करील अशी उधाण लाट इथे त्याने आपल्या मनातील करुणा-सागराला आणली आहे. भवभूति हाच मुळी शारदेची मूर्त करुणा आहे.

हा सहृदय मनुष्य कसा असावा बरे ? हरिजनांच्या मुलास कडेवर घेणाऱ्या एकनाथांची उपमा त्याला साजून दिसेल ? क्रौंचवधाने व्याकुळ झालेल्या करुणाधन वाल्मीकि मुनींची उपमा त्याला शोभेल ? गजेंद्राच्या मोक्षाला धावणाऱ्या करुणामय भगवंताची उपमा याला चपखल बसेल कीं त्या साऱ्या उण्या पडतील ?

अथांग करुणेने भरलेले त्याचे हृदय. ते सदा डोळ्यातून प्रेमाचा वर्षाव करीत असणार. जसे की संत. जसे की ते माउलीचे मन. तुमची सारी दुःखे माझ्याकडे आणून ठेवा, इथे त्यांना जागा आहे, असे त्याचे डोळे सारखे बोलत असणार.

शारदेची मूर्त करुणा असा हा भवभूती आपल्या महाराष्ट्रात विदर्भात होऊन गेला, त्याला बाराशे वर्षे होऊन गेली. शारदेने त्याच्या आधीन केलेली करुणा अजून त्याच्या आधीनच आहे. आणि गोष्टी संपल्या नाहीत पण रात्रच संपली असे म्हणणाऱ्या त्या धन्य आणि सुखी जोडप्यांहून अधिक धन्य आणि सुखी जोडपे अजून जन्माला यावयाचे आहे. संसार करावा राम आणि सीता यांनीच आणि तो वर्णावा भवभूतीनेच.



# बाण

## कविता कामिनीचे स्वप्न

**स्फुरत्कलालापविलासकोमला**
**कथा जनस्याभिनवा वधूरिव ।।**

‘ गद्यं कवीनाम् निकषं वदन्ति ’ असे संस्कृत साहित्यशास्त्राचे वचन आहे. गद्य हे कवीच्या प्रतिभेची कसोटी होय. या कसोटीला पूर्णपणे उतरून बाण हा संस्कृत गद्यलेखकांमधे सर्वकालीन सर्वप्रथम अशी मान्यता पावला आहे.

धनुर्बाणाचा आवाज कानी पडताच वेदपठण करणारे ब्राह्मण ज्याप्रमाणे भिऊन गप्प बसतात त्याप्रमाणे कादंबरीतील बाणाचा आवाज कानी पडताच विद्वान् लोक मौन धरून बसले असे बाणाचा एक टीकाकार म्हणतो. दुसरा म्हणतो, ‘ कुणी कोट्या करण्यात तर कुणी शब्दरचनेमध्ये, कुणी रसनिष्पत्तीमधे तर कुणी अलंकारयोजनेत, कोणी विषयगांभीर्यात तर कोणी कल्पनारचनेत चतुर असेल. पण या चातुर्याने मदोन्मत्त झालेल्या साऱ्या कवींचे गंडस्थळ फोडणारा एकटाच कविसिंह म्हणजे बाण होय. ’

अशा स्पृहणीय गौरवास पात्र झालेला हा बाण इसवी सनाच्या सातव्या शतकात श्रीहर्षाच्या दरबारात ठाणेश्वर येथे होऊन गेला. संस्कृत कवीची नेहमीची खोड सोडून त्याने आपले पुरेसे चरित्र आपल्या ग्रंथात लिहिले असल्याने त्याच्या भोवती दंतकथांचे वलय गुंफिले जाण्यास फारशी संधी

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८८९० वि: निबंध
क्रमांक ९५८२ नों दि



महाश्वेता



बाण

दलाल आर्ट स्टुडिओ प्रकाशन

राहिली नाही. उलट तो संस्कृत साहित्यात इतर कवींची ऐतिहासिक माहिती ठरविण्याचा एक अत्यंत खंबीर असा आधार झाला आहे.

बाणाचे ' हर्षचरित '' पार्वतीपरिणय ' आणि ' कादंबरी ' असे तीन ग्रंथ उपलब्ध आहेत. हर्षवर्धनाच्या नावावर असलेले ' रत्नावली, ' ' प्रियदर्शिका ' आणि ' नागानंद ' हे तीन नाटचग्रंथही बाणाने त्याला लिहून दिले असा प्रवाद आहे. संस्कृतातील अनेक साहित्यविषयक प्रवादांचे स्वरूप पराचा कावळा, अथवा सुताने स्वर्ग अशा तऱ्हेचे असते. या तीन नाटकांच्या कर्तृत्वाबद्दल इतकी अनिर्णीत चर्चा झाली आहे आणि पंडित नावाचा पदार्थ शिल्लक असेपर्यंत पुढेही होणार आहे की तिच्या भानगडीत रसिकांनी न पडणे बरे. रसिकांच्या दृष्टीने ही तीन नाटके कलादृष्टीने अतिशय कमकस आहेत आणि ती बाणाने लिहिली असणे शक्य नाही. ही बाणाने लिहिली असे मानणे म्हणजे आपल्या रसिकतेचे दिवाळे फुंकून बाणाचा अपमान करणे आहे.

बाणाच्या कलेचे वर्णन रसिकतेने ' नववधू ' या शब्दाने केलेले आहे. कलेच्या गौरवास याहून अधिक चपखल शब्द सापडणे केवळ अशक्य आहे. अनाघ्रात कळीच्या सौरभाचा आस्वाद अनुभूतीची जी नवता समूर्त करतो तिचे वर्णन कुणी करावे ? नववधू कलावती असते, तिचे अंतर विलासाकांक्षेने स्फुरत असते, पण अभिनवतेमुळे तिचा कलाविलास अतिशय मुग्ध असतो, कोमल असतो. आणि ही नवकोमलता आस्वादाची अनुभूती देताना एक आगळीच तरल कातरता सजीव करते. एक स्वप्नभूमी निर्मिते. बाणाची कला ही अशी स्वप्नभूमी आहे. आणि या स्वप्नभूमीची रमणीयता त्याच्या 'कादंबरी' या ग्रंथात पराकोटीस गेलेली आहे.

बाणाच्या कादंबरीचे गद्य म्हणजे श्रवणमनोहर आणि अर्थमनोहर अशा संस्कृत रचनेच्या सौंदर्याची पराकोटी होय. ही मनोहरता बाणाच्या वाणीत अशी ठासून भरलेली आहे की अक्षराअक्षरावर मन मोहून जावे. तिथून पुढे जावेसे वाटूच नये. कितीही तरल आणि संवेदनाक्षम मन असले तरी बाणाने शब्दाशब्दातून निर्मिलेल्या मयभूमीतील स्वप्निल सौंदर्याचे यथार्थ रससेवन करण्यास ते थिटेच पडेल. धाराधारांनी प्रभुकृपा कोसळावी, लाखालाखांनी चांदण्या चमचमाव्या, पानोपानी पारिजात फुलावा,

बासुंदीतील दुधाच्या कणाकणात शर्करारस कोंदावा तशी बाणाच्या कादंबरीत माधुरी मातली आहे. किती घ्याल ! किती घ्याल ! मोठ्या भुकेचा भीम झाला तरी फार तर हजार चषक बासुंदी पिईल. पण त्यालाही बासुंदीच्या सागरापुढे नेऊन बसविले तर !

कादंबरीची गत अक्षरश: अशी आहे. तिच्या माधुरीने नुसती मिठी बसून जाते. आकंठ तृप्ती होते. सुस्ती येते. नकळत डोळे मिटतात आणि मन तरल स्वप्नात प्रवेश करून, ढगांचे घोडे जोडलेल्या, तारकांची चाके असलेल्या, चांदण्यांच्या लाटांवरून धावणाऱ्या रथात बसून त्या यक्षभूमीत फिरू लागते. स्वत: बाण हेच शारदेचे रम्य स्वप्न आहे. जागेपणी शारदेच्या हातून अशी स्वप्नमय, मोहमय निर्मिती होणेच शक्य नाही. केवळ स्वप्नातच अशा कल्पना संभवतात. स्वप्नात क्षणात साकार झालेली मोहिनी शब्द-बद्ध करणे सहसा असंभव असते. बाणाच्या असामान्य सामर्थ्याने ही मोहिनी साकार झाली आहे. स्वप्नासारखी स्वप्ने पुन्हा पडत नाहीत. शारदेला असे स्वप्न पुन्हा पडणार नाही. कादंबरीसारखी कादंबरी पुन्हा होणार नाही. शाकुंतलाला मागे सारणारे नाटक होईल, रघुवंशाला उणे पाडणारे काव्य निघेल पण कादंबरीला हिणवणारे गद्य पुन्हा होणार नाही.

ही कादंबरीतील महाश्वेता पाहा. ही शंकरासमोर पूजेला बसलेली चंद्रापीडाला दिसते तेव्हा त्याला वाटते, ‘ तिच्या अंगाची कान्ती समोर पसरलेली आहे, या दुग्ध समुद्राच्या लाटाच आहेत काय ? की या तिच्या तपाच्या राशी आहेत ? की हा भागीरथीचा पुण्यधवल प्रवाह आहे ? की तिने आपल्या भोवती विमल स्फटिकांचे मंदिर तयार केले आहे ? की ती खरी नसून आरशात बिंबित झालेली आहे ? की तिला शारदीय अभ्राने वेढिले आहे ? की ही श्वेतगुणानेच निर्मिली आहे ? की राहूच्या भीतीने शंकरास शरण आलेली मूर्त चंद्रकला आहे ? की हे शंकराचे हास्य सजीव झाले आहे ? ती त्या कर्पूरगौर महादेवाची महत्ता साकार झाली आहे ? की ही प्रफुल्ल पुष्पाची समृद्धी उभी ठाकली आहे ? की भ्रष्ट कलि-युगाला कंटाळून वनात आलेली ही श्रुती आहे ? की पुढे येणाऱ्या कृतयुगाची ही पवित्र जीवनकला आहे ? की ही मौक्तिक कान्तीतून गाळली आहे ? की हस्तिदंतातून कोरली आहे ? की चंद्रकिरणांच्या कुंचल्यांनी स्वच्छ केली

आहे ? की अमृताच्या फेनाने शुभ्र केली आहे ? की पाऱ्याने घुतलेली आहे ? की रुप्याने मुलामा दिलेली आहे ? की, शुभ्रपणाची ब्रह्मदेवाने निर्मिलेली आदर्श इयत्ताच आहे ? की ...... इ० इ०'

महाश्वेतेच्या नुसत्या तेजाचे हे अंशत: वर्णन आहे. हे निरुपम सुंदर अशा स्त्रीचे वर्णन असूनही त्यात कणाचाही शृंगार नाही. तर ती तपस्विनी जे तप करीत होती त्यातील पावित्र्याच्या छटान् छटा जिवंत करून वाचकास त्या तपासमोर नत करण्याचे उदात्त सामर्थ्य या वर्णनात आहे. प्रत्येक नव्या दृष्टान्तात नवे पावित्र्य आणि नवी शुद्धता. आणि हे दृष्टान्त बाणास सहस्रांनी सुचतात (वर अंशत: दिले आहेत.) केवळ स्वप्नातच प्रतिभा असे सुंदर दृश्य पाहू शकते.

वाणाच्या भाषेची माधुरी आगळीच. ज्यांना संस्कृत कळत नाही त्यांनी सुद्धा नुसते ऐकून डुलावे. शुककुलदलितदाडिमीफळद्रवार्द्रीकृततलैरतिचपलकपिकम्पितकक्कोलच्युतपल्लवफलशबलैरनवरतनिपतितकुसुमरेणुपांसलै: असा ओघ गंगेच्या स्रोताप्रमाणे अविरत चाललेला आहे. आकाशपाताळ, चंद्रसूर्य, यक्षकिन्नर, पूर्वजन्मपुनर्जन्म, सारे स्थिरचर यातील तिळतिळ सौंदर्य लुटून हा सौंदर्याचा महोदधी निर्माण केला गेला आहे. आणि या स्वप्नसृष्टीचे कल्पनाविश्व ज्या व्यक्तीभोवती निर्मिले आहे त्या साऱ्या व्यक्ती चालत्या बोलत्या माणसांप्रमाणे सुखदु:खयुक्त आणि सजीव आहेत. आपल्या भोवतीचे विश्व नाहीसे व्हावे आणि तेथे जादूची परिभूमी प्रकट व्हावी आणि तिच्यातून आपण न गोंधळता फिरावे तसे हे कादंबरीचे विश्व आहे. शृंगारसात मन विवश झाल्यावर स्वप्नसाम्राज्य कोणीही निर्माण करील. पण वठलेल्या वृक्षाचे, गलितगात्र वृद्धाचे, निर्जीव पाषाणाचे स्वरूप पाहतानाही त्याच्याभोवती असे विश्व निर्माण करणे हे केवळ बाणालाच साध्य होय. शुककुलदलित इत्यादि वर्णन महाराष्ट्रातील गोदावरी परिसराला अनुलक्षून आहे. असा गोदावरीपरिसर शोधून सापडणार नाही, कल्पून कल्पिता येणार नाही. तो फक्त स्वप्नातच दिसू शकेल. शारदेला तो स्वप्नात दिसला आणि बाणाने तो साकार केला. कारण बाण हेच शारदेचे एक रम्यमनोहर असे स्वप्न होते.



# विशाखदत्त

## कविता कामिनीचे राजकाज

**एका केवल सर्वसाधनविधौ बुद्धिस्तु मा गान्मम ।।**

ज्यात शृंगाररस नाही असे उत्कृष्ट ललित साहित्य असू शकेल असे ज्यास वाटत नाही त्यांनी विशाखदत्त कवीचे मुद्राराक्षस नाटक पाहावे. हे नाटक संस्कृत असले तरी यात नायिका नाही आणि स्तन व जघन शब्दांचा उल्लेख नाही हे कोणास सांगूनही पटणार नाही. पण ही वस्तुस्थिती आहे.

इतिहासकालात भरतभूच्या भाग्यवान सुवणयुगाची प्रभात ज्यान आणिली त्या सम्राट चंद्रगुप्ताच्या राज्यप्राप्तीवर हे नाटक आधारलेले आहे. या नाटकाचा नायक आहे चाणाक्य. कौटिल्य या नावाने ज्याने अर्थशास्त्र लिहिले, वात्स्यायन या नावाने ज्याने कामशास्त्र लिहिले, तो बुद्धीचे मूर्त निधान असा विष्णुगुप्त या नाटकात चाणाक्य या नावाने वावरताना दिसतो. या चाणाक्याची स्वभावरेषा संस्कृत साहित्यात अनन्यसाधारण आहे.

आपल्या वैयक्तिक अपमानाचा सूड म्हणून चाणाक्य हा नंद सम्राटांचा विध्वंस करून चंद्रगुप्तास सम्राट बनवितो. नंदाचा राजनिष्ठ अमात्य

मुद्राराक्षस





**विशाखदत्त**

दलाल आर्ट स्टुडिओ प्रकाशन

राक्षस केवळ राजनिष्ठेमुळेच चंद्रगुप्ताचा निःपात करावयास झटत असतो. हिमालयासारख्या उत्तुंग चारित्र्याच्या या दोन व्यक्तींच्या बुद्धिसामर्थ्याची निःस्वार्थी लढत हा या नाटकाचा विषय आहे. त्यात राजनिष्ठ, पण कुटिलतेत उणा असलेला राक्षस, मूर्तिमंत कौटिल्य अशा चाणक्यापुढे शेवटी हार खाऊन चंद्रगुप्तास वश होतो. चाणाक्याच्या राजकारणी बुद्धीची कक्षा या नाटकात इतकी विस्तृत झाली आहे आणि झेप इतकी उंच गेली आहे की तिच्या दर्शनाने मनुष्य स्मिमित होऊन जातो. सारे भान विसरून जातो. त्रिभुवनाचा विनाश झाला तरी चालेल, जोपर्यंत माझी बुद्धि मला सोडून जात नाही तोपर्यंत मी तो विनाश सावरण्यास समर्थ आहे असा आत्मविश्वास असलेला चाणाक्य आपल्या बुद्धीच्या वैभवाने एवढी उलथापालथ करताना दिसून येतो की ती पाहून ईश्वराचे स्मरण व्हावे. नास्तिकाचा आस्तिक व्हावा. या सृष्टीची सूत्रे ईश्वर चालवितो असे म्हणतात. मुद्राराक्षस नाटकात, यत्किंचित काडी मोडण्यापासून तो महाबलाढ्य साम्राज्याचा विनाश होण्यापर्यंत, घडणाऱ्या सर्व गोष्टी चाणाक्य ज्या अचूक नियंत्रणाने संभाळतो ते नियंत्रण पाहिले की ईश्वर सृष्टी चालवीत असेल याचा संदेह उरत नाही. चाणाक्याच्या बुद्धीच्या दर्शनाने शेवटी एकच भावना मनात स्फुरते, ती म्हणजे या बुद्धीच्या विश्वरूपापुढे साष्टांग लोटांगण घालणे.

आणि आश्चर्याची गोष्ट अशी की आस्तिकत्वाचा साक्षात्कार घडविणारी ही बुद्धि, सात्त्विक बुद्धि नसून कुटिल बुद्धि आहे. राजकारण आहे. मूर्त कौटिल्य आहे. खलातील खलसही आपल्या वक्रतेचा थिटेपणा जाणवावा इतकी कुटिलता या बुद्धीत आहे. केवळ सैतानालाच शोभून दिसावी अशा या बुद्धीतून साक्षात्कार होतो तो मात्र ईश्वराचा. विशाखदत्ताच्या कलेचे इंगित याच यशामध्ये सामावलेले आहे.

साहित्याचा नायक हा धीरोदात्त गुणांचा पुतळा असावा आणि त्याने केवळ प्रेम करीत जीवन कंठावे, ही परंपरा विशाखदत्ताने पार झुगारून दिलेली आहे. यामुळे विशाखदत्ताची स्तुति करावयास प्रवृत्त होणारे टीकाकारसुद्धा म्हणतात की, त्याच्या नाटकात मुग्ध करून टाकील असे कल्पनाविश्व नाही, आणि त्याच्या नाटकाचे नैतिक अधिष्ठान हे असात्त्विक आहे.

वरवर सत्य वाटणारी ही टीका मुळात अर्थशून्य आहे. विशाखदत्ताच्या नाटकात कमलासारखे सुंदर मुख अथवा कलशासारखे डौलदार स्तन अशा कल्पना नाहीत हे खरे. पण अशा मादक कल्पनांची अपेक्षाच या नाटकात करणे हा वेडेपणा आहे. या नाटकाची बैठकच मुळात असल्या रम्य कल्पनांच्या मर्यादेबाहेरची आहे.

नैतिक अधिष्ठानाबद्दलची टीकाही अशीच अर्थशून्य आहे. पहिल्यांदा आपण हे जाणावयास हवे की राजकारण अथवा नृपनीती ही वारांगने-प्रमाणें कुटिलच असावयाची. तिचा तो पिंडच आहे. नृपनीती ही म्हणजे देवपूजा नव्हे की कान्तेस दिलेली नातिचरामीची शपथ नव्हे. असे असले तरीही कुटिल नृपनीती हाच राजधर्म आहे. जेव्हा या नीतीची बैठक निःस्वार्थावर आधारलेली असते तेव्हा तिची सारी कुटिलता लोपून तिचे तेज ईश्वरी गुणाप्रमाणे चमकून दिसते. केतकीच्या बनात नाग असतात; तिच्या पानांना काटे असतात; फुले हाताला मिळू नयेत अशा अडचणीत असतात; पण केवळ एका सुगंधगुणामुळे या साऱ्या दोषांचा लोप होतो. निस्पृहतेमुळे कुटिल नृपनीतीही अशीच शोभून दिसते. गौरवास्पद ठरते. राष्ट्राचे कल्याण, प्रजेचे भवितव्य, अशांसाठी करण्यात आलेली दुष्कृत्येही कडू औषधाप्रमाणे पथ्यकर होतात. चाणाक्य अकरुण कठोरतेने सारी सूत्रे चालवीत असता जरुरीपेक्षा एक केसही अधिक तुटणार नाही यासाठी जागरूक असतो. प्रत्यक्ष चंद्रगुप्ताला दासीपुत्र म्हणून हाक मारण्याचे सामर्थ्य जे चाणाक्यास येते त्याचे कारण त्याला आपल्या सुटलेल्या शेंडीस लावण्यासाठी थेंबभर तेलाचाही स्वार्थ नसतो हे होय. निस्पृह माणसाला राजा हा कस्पटासमान होय अशी चाणाक्याची धारणा आहे. ही उत्तुंग निस्पृहताच चाणाक्याच्या कौटिल्यास दिव्यता देते. जशी भारतातील कृष्णाची कुटिलता विश्वरूप दर्शन घडविते तशीच कौटिल्याची कुटिलता ईश्वरी साक्षात्कार घडविते.

चाणाक्य निस्पृह आहे एवढेच नव्हे तर तो गुणज्ञ आणि गुणग्राही आहे. तो राक्षसाशी बुद्धिबलाचा डाव मांडतो, तो त्याची अतुल गुणवत्ता जाणूनच; असा मनुष्य आपल्या पक्षास आणून त्याच्या हाती चंद्रगुप्तास सोपवावे आणि आपण वनात तपासाठी निघून जावे यासाठीच. " राक्षसा,

तू धन्य आहेस. तुझ्यासारखा या भुवनतलावर तूच " असे म्हणूनच चाणाक्य हा लढा आरंभतो. भीष्म–द्रोणांशी लढावयास उठताच त्यांच्या चरणी बाण टाकून त्यांस वंदन करणाऱ्या अर्जुनाशीच याची तुलना होऊ शकेल. राक्षसाचा मित्र चंदनदास याचा छळ करीत असता चाणाक्य क्षणोक्षणी म्हणत असतो, " चंदनदासा, तू धन्य आहेस. तुला एक शिबि राजाचीच उपमा शोभून दिसेल. " शेवटी आपले काम झाल्यावर चाणाक्य या चंदनदासाला महत्पदाला चढवितो. त्या वेळी भक्ताची कसोटी पाहून तृप्त झालेल्या भगवंताचेच स्मरण होते. यातील स्वारस्य कळावयास भारतीय मन हवे. अस्सल भारतीय मन जेव्हा चाणाक्याची कुटिलता पाहील तेव्हा त्याला ईश्वरी साक्षात्कार होईल यात शंका नाही.

'केवळ मलाच शरण जा' असे आत्मविश्वासाने सांगणाऱ्या भगवान कृष्णाचे महाभारतातील चरित्र पाहून जो आदरानंद वाटतो त्याशीच चाणाक्याचे चरित्र पाहून वाटणाऱ्या आदरानंदाची तुलना होऊ शकेल. असे उत्तुंग दर्शन घडविणारा विशाखदत्त हा कवि इसवी सनाच्या सहाव्या शतकात कनोजचा राजा अवंतिवर्मा याच्या आश्रयाने होऊन गेला. हा स्वत: राजकारणी असल्याने त्याने राजकारण हाच विषय आपल्या निर्मितीसाठी निवडला. शृंगाराच्या गोडीभोवती घोटाळणाऱ्या दुसऱ्या नाटककारांशी याची तुलना करणे अप्रस्तुत होय. पण ती करणाऱ्या लोकांसाठी असा प्रश्न विचारावासा वाटतो की विशाखदत्ताने शृंगारमधुर निर्मिती केली नाही हे खरे; पण प्रत्यक्ष कालिदासानेही राजकारणावर नाटक लिहिले असते तर ते मुद्राराक्षस नाटकाच्या उंचीपर्यंत आले असते काय ?

कविताकामिनीचे या नाटकातील राजकारण केवळ अप्रतिम आहे यात मुळीच संदेह नाही.



# भट्टनारायण

## कविता कामिनीचे रणकाज

**दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ।।**

भारतीय राष्ट्रकवी होण्याचे भाग्य ज्यांना लाभले त्या रवीन्द्रनाथ ठाकुरांचे कुल स्थापन करणारा भट्टनारायण हाही कवी होता. हा मूळचा कनोजी ब्राह्मण असून इसवी सनाच्या सातव्या शतकात आंदिसुर नावाच्या बंगालच्या राजाने याचा सत्कार केल्यावर हा बंगालमध्ये स्थायिक झाला. याचे वेणीसंहार हे एकच नाटक आपणास उपलब्ध आहे.

कलावंत हा आपल्या कलाकृतीमधे आपल्या पिंडाचा आविष्कार करीत असतो. त्यामुळे हा आविष्कार ज्याला झेपेल असाच विषय तो कलाकृती-साठी निवडत असतो. आशयाने मन भरून आल्याशिवाय काही सांगितले जाणे कठीण आहे. गंध कोंदून आत मावेनासा झाला म्हणजेच सुमने उमलतात; कलावंताच्या मनाचे असेच आहे. त्यामुळे कलाकृती हे कला-काराचे जीवनचरित्र झाले नाही तरी व्यक्तित्वाचे प्रतिबिंब खासच ठरते. भट्टनारायणाने महाभारत हा विषय आपल्या कलाकृतीसाठी निवडला आहे एवढे सांगितले की त्याच्या व्यक्तित्वाच्या महत्तेची कल्पना यावयास हरकत पडू नये.



द्रौपदी



भट्टनारायण

दलाल आर्ट स्टुडिओ प्रकाशन

अर्थात महाभारत हा विषय नाटकाच्या मर्यादेत बांधणे ही गोष्ट दुरापास्तच असल्याने भवभूतीची रामायण नाटकात बांधताना जशी पंचाईत झाली, तशीच भट्टनारायणाची झाली आहे. त्यामुळें कालिदास, शूद्रक इत्यादींच्या कलाकृतींमधे जी रचनातंत्राची सफाई दिसून येते त्या दृष्टीने भट्टनारायण उणा पडला आहे. पण यात त्याला कमीपणा मानावयाचे कारण नाही. दोन माणसांचा स्वयंपाक वाटून घाटून मसाला लावून टुकीने करणारी गृहिणी सुगृहिणी खरीच, पण लाखांच्या सैन्याचा रसोडा सांभाळणाऱ्याने असा वाटाघाटीचा प्रपंच केला नाही म्हणून त्याची गृहिणीशी तुलना करून त्याला कोणी उणा ठरवील काय ? प्रसंग पडल्यास तो दोन माणसांचा स्वयंपाक गृहिणीप्रमाणे अवश्य करील. गृहिणीला मात्र लाख माणसांचा रसोडा सांभाळणे फार जड जाईल.

ही गोष्ट जशी खरी तशीच रामायण-महाभारतात कथानक असे पुन्हा सांगण्याजोगे काही नाही हीही गोष्ट खरी. त्यामुळे त्या परिचित अशा कथानकाच्या रचनातंत्राची आटापीट करण्याऐवजी, त्या कथानकातून जे नवीन काही सांगावयाचे असेल ते सांगण्याकडेच लक्ष देणे कवींना अधिक आवडत असावे. रामायणाच्या युद्धकांडापर्यंत माणूस असणारा राम उत्तरकांडात सीतात्याग करताना पाषाणमूर्ति देव बनतो ही गोष्ट खटकते. भवभूतीने अश्रूंच्या पवित्र गंगेत हे त्याचे पाषाणत्व धुऊन त्याला पुन्हा माणूस बनविला आहे. भट्टनारायणाने सुद्धा महाभारतात संवेदनाशून्य पाषाणाप्रमाणे मिरविणाऱ्या युधिष्ठिराला तासूनछिनून त्याचा आपल्या नाटकात माणूस बनविला आहे. भवभूतीच्या काली कला ही शिष्टांच्या आश्रयाखालून निघून सामान्यांच्या आश्रयाखाली आली होती असे स्पष्ट दिसते. भट्टनारायण हाही भवभूतीस समकालीन असून त्याच्या कलाकृतीच्या दर्शनाने वरील तर्कास दुजोरा येतो. भरल्या पोटी ढेकर देत परलोकाची शुष्क चर्चा करणाऱ्या शिष्टांना युधिष्ठिर हा माणूस बनणे परवडणार नाही. परलोकाची फिकीर न करणाऱ्या सामान्य ऐहिकांनाच तो पेलू शकेल. भट्टनारायणाचा युधिष्ठिर हा असाच संताप येऊ शकणारा, भारतीय युद्ध पेलू शकणारा, दुःखाने व्याकूळ होऊ शकणारा असा दाखविला आहे. युधिष्ठिराच्या अमानुष चरित्रामधे

भट्टनारायणाने जे हे मानुषी रंग कालविले आहेत त्याची त्याला शिष्टांनी मुळीच क्षमा केलेली नाही. युधिष्ठिराच्या चरित्राला भट्टनारायणाने कलंक लावला अशी टीका त्याच्यावर तहत आजपर्यंत होत आहे.

वेणीसंहार नाटक संपते ते दुःशासनाचे रक्त प्यालेला आणि दुर्योधनाच्या रक्ताने न्हालेला भीम द्रौपदीची वेणी बांधतो तेव्हा. हाही प्रसंग शिष्टांना पचू शकलेला नाही. दुसऱ्याच्या पत्नीची अब्रू लुटली जात असता त्याने शांत राहावे असा उपदेश करणे खरोखर सोपे आहे. स्वतःच्या पत्नीची अब्रू लुटली जात असतानाही जो समर्थ असेल त्यालाच चेव येईल. जो असमर्थ असेल तो त्या पत्नीस भ्रष्ट होऊ देऊन स्वतःसाठी दुसरी पवित्र पत्नी शोधावयाच्या मार्गास लागेल. भीम हा समर्थ होता. द्रौपदीवर अत्याचार झाला तेव्हाच त्याच्या सामर्थ्यास वाव मिळता तर दुःशासन-दुर्योधनाच्या वधाने सारा प्रसंग संपता. पण त्याच्या क्रोधाचा अग्नि चौदा वर्षे धुमसत ठेविला गेला. आणि शेवटी त्याचे शमन दुःशासनाचे रक्त प्याल्याशिवाय होणेच अशक्य झाले. हे व्यासांना पटले म्हणून त्यांचा भीम निःशंकपणे दुःशासनाचे रक्त प्याला. भट्टनारायणाने त्याला रक्तस्नात स्थितीत रंगमंचावर आणून नाटकाचा कळस बांधला आहे. वेदांती शिष्टांनी काहीही म्हटले तरी ही भीमाच्या सामर्थ्याची आणि क्रोधाची अटळ परिणती आहे. 'नरडीचा घोट घेईन' हा वाक्यप्रयोग ज्यांना मान्य आहे त्यांना हे मान्य व्हावयास हवे.

भट्टनारायणाला महाभारतातील पौरुषाचेच प्रसंग टिपावयाचे असल्याने शिष्टांना अप्रिय अशी दुसरीही एक घटना या नाटकात घडून आली आहे. पांडवपक्षाकडे निरपवाद पौरुष असे एकटया भीमाकडेच होते. उलट कौरवांकडे ते दुर्योधन, दुःशासन, कर्ण, अश्वत्थामा इत्यादि अनेक वीरांच्याकडे असल्याने नाटकात पांडव हे मागे पडले असून कौरवांना अधिक उठाव मिळाला आहे.


पौरुष हा जसा भट्टनारायणास महाभारताचा वर्ण्यविषय सापडला तसाच द्रौपदीच्या अपमानाचा बदला हाच त्याला महाभारताचा तात्पर्यार्थ सापडला. हस्तिनापूरच्या राज्याच्या हक्कांची फारशी पत्राज भट्टनारायण ठेवीत नाही. खलांच्या रक्तात भिजलेल्या हातांनी द्रौपदीची

वेणी घालणे हेच महाभारत होय हे भट्टनारायणाने स्पष्ट केले आहे. भट्टनारायणाने आपली कलाकृती निर्मिली आहे, ती शिष्टांस डावलून आपणास पटला तो भारताचा अर्थ सांगण्यासाठी निर्मिली आहे. आणि शिष्टांनी नाके मुरडली तरी ती रसिकांनी कपाळावर घेतलेली आहे.

वेणीसंहाराचे आणखी एक वैशिष्टच म्हटले म्हणजे त्याचे रसवैचित्र्य होय. कवी म्हटला की तो शृंगाराच्या मधुघटातच बुडलेला असावयाचा. चुकून कुठे जोराने बोलला तर वीररस; हसला तर हास्यरस. प्रश्न संपला. पण भट्टनारायणाने वीर, रौद्र, भयानक, बीभत्स, करुण या साऱ्या रसांचे समुद्र आपल्या नाटकात निर्मिले आहेत. त्यामुळे संस्कृत साहित्यशास्त्रकारांचे वेणीसंहाराशिवाय पाऊल हालत नाही. याच नाटकातील जास्तीत जास्त श्लोक साहित्यशास्त्रात उद्धृत केले आहेत असे म्हटले तर अतिशयोक्ति होईल असे वाटत नाही.

ओज हा या नाटकाचा स्थायीभाव आहे. इथे शृंगाराला जसे ओजापुढे नमविले आहे तसे करुणालाही ओजापुढे शरण आणले आहे. भीम धृतराष्ट्रास वंदन करतो ते असे: " तात, तुमच्या अठ्ठ्याण्णव पुत्रांचे चूर्ण करून आलेला, दुःशासनाचे रक्त पिऊन उन्मत्त झालेला आणि दुर्योधनाची मांडी फोडावयास निघालेला हा भीम तुम्हांला वंदन करीत आहे. "

मुखवटे घालून हिंडणाऱ्यांना भीमाची ही धडक सहन होणार नाही, पण रणांगणात मुखवटे चालत नाहीत. वेणीसंहार नाटक हे आरंभापासून अखेरपर्यंत ओजाने रसरसलेले रणकुंड आहे, ते क्रुद्ध रणचंडीचे तांडव नर्तन आहे. इथे मुखवट्यास ज़ागा नाही. मुखवटे इथे तुटतील, फुटतील, भंगतील, वितळतील. इथे सारा गंज झडून जाईल. ज्याचे त्याचे स्पष्ट रूप दिसून येईल. युद्धाच्या नुसत्या वार्ताच करू जाणाऱ्या उच्चभ्रूंना हे न रुचो. पण दोन देण्याची आणि दोन घेण्याची रग ज्यांना आहे अशा रगेल लोकांनी कविताकामिनीचे हे रणचंडीच्या रूपातील ओजस्वी दर्शन शिरावरच घेतलेले आहे. ' दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम् ' हे भट्टनारायणाचे वाक्य तर वेदतुल्य प्रामाण्य पावत आहे असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.



# जयदेव

## कविता कामिनीची माधुरी

**मधुर कोमल कान्त पदावलिम्–**
**श्रृणु सदा जयदेवसरस्वतिम् ।।**

हिमालय हाच जगात सर्वात उंच पर्वत होय. गंगा हीच जगातील शुचितम नदी होय. शुक्र हीच आकाशातील सर्वात रम्य चांदणी होय. त्याचप्रमाणे जयदेव कवीची ' गीतगोविंद ' हीच जगातील शृंगाररसपर भावकवितातील सर्वात मधुर कविता होय. जगातील सर्व भाषांत संस्कृत हीच मधुरतम भाषा आहे; आणि गीतगोविंद हे संस्कृतातील मधुरतम काव्य आहे. ही गोष्ट भूत आणि वर्तमानकाली जेवढी अबाधित राहिली आहे तेवढीच भविष्यकालीहि अबाधित राहणार आहे. हिमालयापेक्षा अधिक उंच पर्वत निर्माण होण्याची शक्यता असली तरच गीतगोविंदापेक्षा अधिक मधुर काव्य निर्माण होऊ शकेल.

जयदेवाच्या भाषेत सांगावयाचे म्हणजे हे काव्य वासुदेवाच्या रतिकेलीचे वर्णन करणारे आहे; अर्थात् शृंगारकाव्य आहे. यात अथपासून इतिपर्यंत शृंगारच भरला आहे, याचा निरामय रसिकाला संदेह वाटावयास नको. या गीतावर भक्तिरसाचा आरोप केला जातो. एकांताच्या भ्रान्तीने आपण कान्तेच्या अधराचे पान करीत असताना अवचित कोणी आपणास



गीतगोविंद



# जयदेव

दलाल आर्ट स्टुडिओ प्रकाशन

पाहिले की आपण म्हणतो, "प्रियेच्या नयनात धूलिकण गेला होता तो जरा फुंकर मारून उडवीत होतो." गीतगोविंदाचा आस्वाद निरामयपणे घेण्याऐवजी तो घेताना विकृत संकोच वाटला की मग, शृंगार-माधुरीचा मोह तर आवरत नाही, आणि संकोच तर सुटत नाही, अशा अवस्थेत, मन या शृंगारावर भक्तीचा आरोप करून आपले समाधान करून घेत असते. मन निरामय असेल तर कान्ताच्या करकमलात लालनासाठी म्हणून आपले सुडौल स्तनमंडळ अर्पण करणाऱ्या कान्तेच्या समर्पणाला भक्ति न म्हटले तरी त्यातील रसाची माधुरी मुळीच उणी होणार नाही.

प्रसाद, ओज आणि माधुर्य हे काव्याचे तीन गुण होत. मोठमोठ्या कविश्रेष्ठांनाही यातील एखादाच गुण ईश्वरकृपेने साध्य होतो. कालिदासाचा प्रसाद, भारवीचे ओज, बाणाची माधुरी यामुळेच त्यांची काव्ये उत्कर्ष पावली आहेत. पण जयदेव हा असा एकटाच भाग्यवान कवी आहे की त्याला प्रसाद आणि माधुर्य या दोन्ही गुणांचा परमोत्कर्ष वश झालेला आहे. त्यामुळे त्याच्या काव्याला मदिरमाधुरी प्राप्त झाली आहे. तिची गोडी कुणी वर्णावी ! ती ज्याची त्यानेच जाणावयास हवी. मोहळातून थेंबाथेंबाने ओघळणाऱ्या मधाचे आकंठ सेवन केल्यावर जी तृप्ती वाटते ती कोण वर्णील ? चांदण्या रात्री अंगावर बकुल फुलांचा सेक झाल्यावर वाटणाऱ्या अनुभूतीतील सौगंध कोण शब्दबद्ध करील ? मध्यरात्रीच्या नीरव एकान्तात सागराच्या ओहोटीची मर्मर ऐकून उत्पन्न होणारी आर्तता कोण वर्णन करू शकेल ? नवोढेच्या पहिल्याच सर्वांगस्पर्शाने उत्पन्न होणाऱ्या पुलकात फुललेला आमोद कोण शब्दसाकार करील ? विजेच्या वेगाने सळसळणारा जातिवंत रसरशीत नाग अंगावरून गेला तर उठणाऱ्या भीतीच्या रोमांचांचे चित्र कोण रंगवू शकेल ? साक्षात्कार झाला की होणऱ्या केवलानंदाची प्रचीती कोण दुसऱ्यास आणून देऊ शकेल ? जो हे करू शकेल त्यानेच गीतगोविंदाची माधुरी वर्णण्याचा प्रयत्न करावा. इतरांनी ती आपली आपणच जाणावयास हवी.

गीतगोविंद हे उत्तरोत्तर अधिकाधिक रमणीय अशा चोवीस भावगीतांचा एकसूत्र संग्रह आहे. यातील मधलेच एकादशावे गीत गाताना जयदेव म्हणतो, 'गोपीच्या पीन पयोधराचे मर्दन करण्यात ज्याचे कर-

युगल कुशल आहे असा वनमाली, मंद समीरणामुळे सुखद, कालिंदी–सानिध्यामुळे शीतल आणि कुसुमित लतामुळे सुगंधित अशा, अभिसारोत्तर रतीसाठी उचित असलेल्या, कुंजवनात गेला आहे. रतिसुखाचे सारसर्वस्व अशा संकेत स्थली गेलेल्या मुकुंदाने मदनमनोहर वेष केला आहे. हे राधिके, त्या हृदयनाथाकडे तू चल. पृथु नितंबाच्या सुखद भारामुळे तुझी कोमल पावले जड पडतात हे खरे. पण यावेळी त्वरा कर. गति मंदावून गमनाला विलंब करू नकोस. तुझ्याशी संकेत केल्याप्रमाणे तो माधव ‘ हे राधिके, हे प्राणसखे ’ असे सूर गुंफून मंजुळ पावा वाजवीत आहे. तुझी तनु त्याला निरतिशय प्रिय आहे. तुझ्या तनुसंगतीने पावन झालेल्या पवनाने चलित झालेले अणुरेणुही त्याला प्रिय आहेत. विहंगांनी हालचाल केली; तरुपर्णे विचलित झाली की ही प्राणसखी आली अशा आशेने तो चकित नयनांनी तुझ्या पंथाकडे पहात आहे. त्याने तुझ्या रतिकेलीसाठी शेज रचिली आहे. सखी चल. रतीची शोभा पाहावयास मिळणार म्हणून अधीर झालेल्या आणि छुम छुम करणाऱ्या मुखरित नूपुरांचा तू एखाद्या रिपूप्रमाणे त्याग कर. अंधारात नजरेस येणार नाही असे नील अवगुंठण घेऊन तिमिरपुंजाने सुरक्षित झालेल्या कुंजात चल. तुझे पूर्वसुकृत सफल झाले आहे. तू मुरारीच्या उरावर पुरुषाइतासाठी विराजमान होणार आहेस. तेव्हा तो मेघश्याम श्याम मेघाप्रमाणे शोभेल. हालचालीत झुलणारी मुक्तामाला मेघ परिसरातील तरल बलाकांप्रमाणे दिसेल आणि हे पीतवर्ण कामुकी, तू मेघावरील विजेप्रमाणे शोभतील. त्या मदनमनोहराचे दर्शन झाले की तुझे वसन नकळत विगलित होईल. रसना ओघळून पडेल, जघन आच्छादनरहित होईल. रतिसुखातील हर्षाची जणू खूणच, केवलानंदाचे निधानच, असे ते जघन मग तू किसलयाच्या शयनावर निजलेल्या कमललोचन घनश्यामाच्या अंकाशी नीट जुळव. चल सखी, तू माझे वचन ऐक. त्वरा कर. त्या मधुरिपूची कामवासना पुरी कर. नाहीतर ही रजनी संपावयास आली आहे. सखी, तो हरी अभिमानी आहे. अभिसार काल टळून गेला तर तो तुझे लाघव सहन करणार नाही. ’

ही जयदेवाची कविता. किती मधुर हा आशय! आणि जयदेवाच्या काव्यकलेचा उत्कर्ष असा की हा मधुर आशय त्याने त्याहूनही मधुर वाणीने

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 3८८९० वि: ...
क्रमांक १५८२ नों: दि: ...



सांगितला. वरच्या अष्टपदीतील (भावगीतातील) पहिल्या पदाचा एक चरण असा आहे.

**न कुरु नितंबिनि गमनविलंबन अनुसर तं हृदयेशम् ।**

ही रचना जशी आशयपूर्ण आहे तशीच सुगमही आहे आणि मधुरही आहे. या ओळीच्या सात सात अक्षरांच्या पहिल्या तीनहि यतींच्यामध्ये अक्षरे लघु आहेत व प्रत्येक यतीमधील पाचव्या अक्षरावर अनुस्वाराचा अनुप्रास आहे. त्यामुळे प्रसंगी अर्थ न कळला तरी ही मधुर स्वररचना मनाची पकड घेते. सूर तालबद्ध गीताच्या रूपाने जिभेवर साकार होतात. ही रचना म्हणजे मूर्त संगीत आहे. इतर कवी जेव्हा अशी शब्दरचना करू पाहतात तेव्हा तिथे नुसते शब्द राहून अर्थ पार लोप पावतो. माघ कवीने अक्षरे जुळविली तेव्हा पुढील रचना तयार झाली.

दाददो दुद्दुद्दादी दादादो दूददीददोः । (शिशुपालवध १९।११४)
नीलेनाऽनालनलिननिलीनोल्ललनालिना ।। (शि. १९।८४)

याचा अर्थ खुद्द माघासही लागणे कठीण. पण जयदेवाच्या स्वररचनेत टपोर द्राक्षांचा रस ओथंबावा तसा अर्थ ओथंबला आहे. ही किमया जयदेवास साध्य झाली, कारण त्याने कविता लिहिली नाही तर कविता त्याला स्फुरली. जणू कृष्णाची मुरलीच जयदेवाच्या करांगुलीचे रूप घेऊन ही माधुरी स्रवली. तीही वेणुगीताप्रमाणे गीतरूप घेऊनच साकार झाली. जयदेवाची सारी गीते, " माधवे, सखि माधवे ", " प्रिये चारुशीले, प्रिये चारुशीले " अशी तालबद्ध सुगम गेय स्वरूपे घेऊन साकार झाली आहेत. माधुरी, रम्यता, सुगमता, ललितता, गेयता यांचा हा प्रवाह सबंध गीतगोविंदाच्या ओळीओळीत अविरत पाझरत आहे. प्रतिभेचे ईश्वरी साक्षात्कार हे स्वरूप कुठे पाहणे असेल तर ते जयदेवाच्या गीतगोविंदातच दिसेल.

भासकाली मुग्ध शृंगार करणारी, कालीदासकाली विलासिनी झालेली कविताकामिनी यावेळी रतिकलापारंगत अशी प्रौढा झालेली आहे. ती कान्ताकडे जाते ती सहसा पुरुषाइताची आतुरता धरून जाते. पण या पुरुषाइतात आत्मार्पणाची ओढ आहे; उन्माद नाही. जणू पुरुषाइत करावयाचे ते मुरारीला सुखविण्यासाठी. ही हालचाल करणार ती त्या श्यामसुंदराला कष्ट होऊ नयेत म्हणून. त्याला सुखाच्या तृप्तीत बुडविणे हीच


तिची आकांक्षा. त्यामुळे जयदेवाचा शृंगार कालिदासाहून अनेक पटीने उत्तान असूनही कालिदासाच्या शृंगारात जी भोगाची जाणीव होते ती जयदेवाच्या शृंगारात होत नाही. उलट त्यागाची, आत्मार्पणाची जाणीव होते. जयदेवावर भक्तीचा आरोप केला जातो तो यामुळेच. वस्तुतः ही सारी शृंगारकविता आहे.

जयदेवास आपल्या मधुर कर्तृत्वाची जाणीव आहे; अभिमान आहे. साहजिकच आहे. स्तनमंडलाचा डौल रूपगर्विता मिरविणार नाही तर काय कुब्जा मिरविणार? त्यामुळे जयदेव आपल्या वाणीबद्दल डौलाने म्हणतो, "शृंगाररसाचे परममंगल सारसर्वस्व अशी जयदेवाची विदग्ध वाणी जोवर प्रचलित आहे, तोवर हे मधुरते, मी हिच्यासारखीच गोड आहे असे तू मानलेस तर त्यात खरेपणा असणार नाही. हे साखरे, तुझ्या नावातच जिथे खर आहे तिथे तू गोडीचा गर्व काय वाहावा? हे द्राक्षाफला, तुला भ्यावयाचे कारण नाही. कारण ही वाणी असेतो तुला मधुर मदिरेसाठी कोणी पिळणार नाही. हे अमृता, तुझे नाव बदल. कारण माझ्या वाणीपुढे तू मृतच झाले आहेस. हे क्षीरा, तुला अभिमान कशाला! तुझ्यातील रस म्हणजे नुसते नीर आहे. हे आम्रफला, तू क्रंदन कर. माझा इलाज नाही. माझ्या वाणीपुढे तू विफल आहेस. हे कान्तेच्या अधरा, तू माझ्या वाणीच्या माधुरीशी तुलना करण्याची आशा धरू नकोस."

इतकी थोडी कविता लिहून इतके विपुल यश मिळण्याचे भाग्य एका जयदेवासच लाभले. हा कवी बाराव्या शतकात बंगालचा राजा लक्ष्मणसिंह याच्या दरबारात होऊन गेला. इतक्या प्रख्यात कवीबद्दल दंतकथा नसतील तरच नवल. त्यामुळे जयदेवाचे दंतकथामय विस्तृत चरित्र उपलब्ध आहे. पण त्याला ऐतिहासिक आधार नाही. या दंतकथांप्रमाणे पद्मावती ही जयदेवाची कान्ता मोठी पतिव्रता असते. राणीकडून तिच्या पातिव्रत्याची परीक्षा घेण्याच्या खटाटोपात तिला मृत्यू येतो. ती मरण पावल्यावर जयदेव जगन्नाथापुढे धरणे धरून त्याची या चोवीस भावगीतांनी आळवणी करतो, तेव्हा पद्मावती जिवंत होते. पुढे या कवितांच्या कीर्तीमुळे मत्सरी होऊन राजाही कविता करतो. पण जयदेव व राजा यांची कविता जगन्नाथापुढे परीक्षेला ठेवली असता जगन्नाथ जयदेवाची कविता हृदयाशी

धरून राजाची कविता फकून देतो. अशा अनेक दंतकथा आहेत. पण या दंतकथांचा जयदेवास आधार नसून जयदेवाचाच दंतकथांस आधार आहे हे काय सांगावयास हवे ? गीतगोविंद हेच जयदेवाचे चरित्र आहे आणि ते सांगत आहे की जयदेव हा माधुरीच्या बाबतीत जगातील सर्वप्रथम कवी आहे. तो कविताकामिनीची मूर्त माधुरी आहे.





# जगन्नाथ

## कविता कामिनीचा आत्मविश्वास

निर्दूषणा गुणवती रसभावपूर्णा
सालंकृतिः श्रवणकोमलवर्णराजिः ।।


ज्याच्याबद्दलच्या सुरस दंतकथा इतिहास खऱ्या म्हणत नसला तरी खोट्याही म्हणू शकत नाही असा भाग्यवान संस्कृत कवी पंडितराय जगन्नाथ हा होय. हा संस्कृत भाषेतील शेवटचा थोर कवी तुलनेने फारच आधुनिक असून सतराव्या शतकाच्या आरंभी होऊन गेला. अकबर, जहांगीर आणि शहाजहान या तीन मोगल बादशहांच्या वैभवशाली कारकीर्दी त्याने आपल्या ऐंशी वर्षांच्या दीर्घ आयुष्यात पाहिल्या.

तो जन्माने आंध्र होता. वयाची बारा वर्षेपर्यंत त्याने मुळीच अभ्यास केला नव्हता. पुढे एकाएकी त्याला विद्यारुची उत्पन्न होऊन तो महापंडित झाला. आपल्या विद्येचे चीज, मायभूमी आणि कर्नाटक यात होत नाही असे पाहून त्याने देशांतर केले व जयपूरच्या दरबारात जाऊन सन्मान मिळविला. यावेळी अकबराचे दरबारात एक यवन काझी होता. त्याने वादविवाद करून हिंदु पंडितांना जिंकिले होते. जगन्नाथास हे कळताच त्याने यवनी भाषा आणि कुराण यांचा अभ्यास केला आणि मग त्या काझीस आव्हान देऊन त्याचा पराजय केला. त्याच्या कुराणातील ज्ञानावर मोहून



लवंगिका

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
१५८२



**जगन्नाथ**

दलाल आर्ट स्टुडिओ प्रकाशन

जाऊन गुणग्राही अकबराने त्याला आपल्या दरबारात मानाचे स्थान दिले.

जगन्नाथ हा उत्तम पंडित होता तसा रसिक कविही होता. अकबराचे त्याच्यावर मन बसले तसे अकबराच्या अंतःपुराचे दरवाजे जगन्नाथाला खुले झाले. एकदा अकबराशी बुद्धिबळे खेळत असता, अकबराची लवंगी नावाची तन्वंगी कन्या पित्यास जलपान देण्यासाठी मस्तकावर जलकुंभ घेऊन आली तेव्हा बादशहा म्हणाला, ‘ कविराज, तुम्हाला हिच्यावर कविता करता येईल काय ? ’ अकबराचा हा प्रश्न पूर्ण होण्याच्या आतच जगन्नाथाने आपली कविता म्हणून दाखविली.

‘ ही कुसुंबी रंगाचे सुंदर वस्त्र नेसलेली तुझी सुस्तनी कन्या डोक्यावर घडा घेऊन चालली म्हणजे सर्व जगताची चित्ते त्या घडयात घालून घेऊन जाते. ’

हे काव्य ऐकून बादशहा खूष झाला. त्याने जगन्नाथास मागेल तो वर देण्याचे मान्य केले. हा भाग्यवान क्षण हातातून निसटू न देण्याची समयसूचकता आणि धिटाई जगन्नाथाकडे होती. त्यामुळे त्याने उत्तर दिले.

‘ राजा, जर देणार असशील तर मला हत्ती-घोडयांची आकांक्षा नाही. द्रव्याची हौस नाही. ही हरिणीसारखे डोळे असलेली तुझी सुस्तनी कन्या मला दे. ’ जगन्नाथाची ही धिटाई बघून बादशहाला धक्का बसला. पण जगन्नाथाचे सौंदर्य, रसिकता आणि धीटपणा यामुळे लवंगीचेच मन जगन्नाथावर गेल्याचे त्याला कळून आले. त्याने हा विवाह होऊ दिला आणि जगन्नाथावर वैभवाचा पाऊस पाडला.

सनातनी पंडितांना हे सहन झाले नाही. त्यांनी जगन्नाथाला बहिष्कृत केले. पण राजा आणि द्रव्य यांचा आधार असल्याने जगन्नाथाने पंडितांना जुमानले नाही. उलट पंडितांचे अग्रणी भट्टोजी दीक्षित आणि अप्पय्या दीक्षित यांच्या पांडित्याचा जाहीर अधिक्षेप केला. भट्टोजी यांच्या ‘ मनोरमा ’ या ग्रंथाचे त्याने ‘ मनोरमाकुचमर्दन ’ या ग्रंथात खंडन केले. अप्पय्या यांच्या ‘ चित्रमीमांसा ’ ग्रंथाचे ‘ चित्रमीमांसाखंडन ’ या ग्रंथात त्याने खंडन केले. आपल्या स्वतःच्या पांडित्याचा निदर्शक असा ‘ रस-

गंगाधर' नावाचा अद्वितीय साहित्यशास्त्रपर ग्रंथ त्याने लिहिला असून तो ग्रंथ संस्कृत साहित्यशास्त्राच्या विशाल मंदिराचा कळस ठरलेला आहे.

साहित्यशास्त्रात जागोजाग काव्याची उदाहरणे लागतात. सारे रस, सारे अलंकार यांची ही उदाहरणे कधीहि एकाच काव्यात लाभत नाहीत. साहित्यशास्त्रज्ञ ही उदाहरणे स्वतः बनविण्याच्या फंदात पडत नाहीतच. कारण पांडित्य आणि कवित्व यांचे बहुधा वाकडेच असते. त्यामुळे ही उदाहरणे इतरांच्या ग्रंथातून घ्यावयाची प्रथा आहे. पण रसगंगाधर ग्रंथ लिहिताना 'मी दुसऱ्याचे एक अक्षरही घेणार नाही तर स्वतःचे काव्य निर्माण करीन' अशी आत्मविश्वासपूर्ण प्रतिज्ञा जगन्नाथाने केली आहे आणि ती पार पाडली आहे. संस्कृत साहित्याच्या इतिहासात असा पंडित कवी कविराज जगन्नाथ पंडित हाच होय.

जगन्नाथाने यवनी कान्ता केली तरी त्याचा पिंड हिंदूचा होता. भारतीय संस्कृतीतील आदर्शांनी त्याच्या मनाचा ताबा सोडला नव्हता. त्यामुळे गंगालहरीसारखी भक्तीने ओथंबलेली काव्येही तो लिहू शकला. त्याच्या मनाची ठेवण नीट जाणण्याची कुवत नसणाऱ्या पंडितांनी त्याने कान्तेचा त्याग केला तर त्याला शुद्ध करून घेण्याची तयारी दर्शविली. पण धर्म हा बाह्य अवडंबरापेक्षा मनाच्या धारणेवरच अवलंबून असतो असे मानणाऱ्या जगन्नाथाने पंडितांस झुगारून देऊन कान्तेसच जवळ केले. दीर्घायुष्य भोगून आता देहत्याग करावा असे वाटले तेव्हा त्याने गंगेचा पूर येत असता तिच्या घाटावर बसून आपल्या गंगालहरीचे गायन चालू केले. जणू तान्हे वासरू आपल्या माउलीसाठी प्रेमाने टाहो फोडीत होते आणि प्रेमपुराने उसळणारी माउली हुंडारत आणि हंबरत धावत येत होती. श्लोकामागून श्लोक संपला. पायरीपायरीने अंतर तुटले. माय-लेकराची मिठी पडली. आणि शेवटी जगन्नाथाला हृदयावर मिरवीत गंगामाउली आनंदोत्फुल्ल मनाने पुढे निघून गेली.

रसगंगाधराशिवाय भामिनीविलास, गंगालहरी, सुधालहरी, करुणालहरी, अमृतलहरी इत्यादि जगन्नाथाची काव्यसंपदा आहे. गंगालहरी आदींमधे जशी त्याची उत्कट भक्ति दिसून येते तशीच भामिनीविलासातील

त्याची उत्कट शृंगारासक्ति कालिदास-जयदेव यांचे स्मरण करून देते. स्तोत्राशिवायची त्याची सारी काव्यरचना स्फुट स्वरूपाची आहे. एकेक श्लोक हेंच एकेक काव्य. पण या श्लोकातून जी शब्दचित्रे उभी राहतात ती मनाला पूर्णपणे मोहून टाकतात. एक शब्दचित्र असे आहे;

'प्रभातेला मंगल स्नानाने शुचिर्भूत होऊन माझी लाडकी माझ्या पित्याकडे आली आणि तिने सासऱ्यास नमस्कार केला. तेव्हा माझा पिता म्हणाला, 'पुत्रवती भव.' हे शब्द ऐकताच ती लाजून गोरीमोरी झाली. तिची मान खाली गेली. बाजूलाच बसलेल्या माझ्याकडे तिने चोरटा कटाक्ष टाकला.' इथे पिता बिचारा सरळपणे पुत्रवती भव असा आशीर्वाद देतो. पण त्या आशीर्वादाने नववधूला नुकतीच केलेली पुत्रप्राप्तीस कारण होणारी शृंगारलीला स्मरते.

दुसरे चित्र पहा. 'प्रभात झाली. आता प्रियकराची मिठी सैलावेल अशी तिला भीती वाटली. त्याला प्रभात झाल्याचे कळूच नये म्हणून तिने आपल्या कोमल करांनी त्याचे नेत्र झाकले. बिचारी! मंदमंद वाहणारा वारा कमलगंध वाहून आणीत होता आणि त्यामुळे प्रभात झाल्याचे त्याने आधीच जाणले होते.'

आणि हे तिसरे चित्र. 'पहिल्या मीलनाचा दिवस. रतिसुखाच्या आनंदासाठी कान्ता उत्सुक झाली होती. मधेच आपले मनोगत प्रकट करण्यासाठी ती नयनांनीच बोले तेव्हा तिचे विशाल नेत्र पूर्ण उघडत. पण त्या नयनांची भाषा वाचली गेली की ते लाजून पुन्हा मिटत.'

गंगेची स्तुति करताना जगन्नाथ म्हणतो, 'रूपसुंदर नृपरमणी स्नानासाठी गंगेत उतरली. भीत भीत ती स्तनाएवढ्या पाण्यात गेली. तिच्या सुडौल स्तनांना लावलेला कस्तुरीचा लेप विरघळून पाण्यात मिसळला. अहाहा! त्याच क्षणी ज्या मृगाच्या नाभीतून ती कस्तुरी काढली होती, तो मृग गंगेच्या पावन स्पर्शाने जीवन्मुक्त झाला.'

नामसुधेचे वर्णन करताना जगन्नाथ म्हणतो, 'तू द्राक्षारस प्यालीस. शर्करेची माधुरी सेविलीस. धारोष्ण दुधाच्या फेसाने सुखावलीस. कान्तेच्या अधराचा चावा घेतला, तेव्हा तर अमृताची रुची तुला कळली. पण हे रसने, कृष्ण हे नाम उच्चारताना जी गोडी लाभते ती वेगळीच नाही काय?'

आपले स्वतःचे वर्णन करण्यासाठी जणू जगन्नाथ म्हणतो, 'मी उपनिषदे कोळून प्यालो. गीता मुखोद्गत केली. पण माझ्या मानससदनातून ती विधुवदना काही बाहेर जात नाही.'

जगन्नाथाचे काव्य शृंगाराबहुल असले तरी त्यात जयदेवाप्रमाणे केवळ शृंगारच नाही. त्याच्या प्रतिभेला इतरही सौंदर्यदृश्ये दिसतात. एके ठिकाणी तो म्हणतो, 'प्रभात झाली. अरविंद उमलले. मकरंदाचा गंध फैलावला. त्या मकरंदाला लोलुप असे भृंग कमलाचा उपभोग घेत मंजुगुंजन करू लागले. परंतु जो गंध बाहेर उधळला गेला, तो निस्पृहपणे ज्या वायुलहरींनी आपल्या तरल लाटेवर दशदिशात वाहिला, त्या वायुलहरींनीच खऱ्या स्नेह्याप्रमाणे कमलाची कीर्ती पसरली.'

आणि हे दुसरे चित्र : 'ग्रीष्माचे दिवस आले. हमरस्त्यावरचा जलाशय. पान्थ त्याचे पाणी पिऊन तृप्त होऊ लागले. त्याने तो आटू लागला. आपण आटत आहो हे त्याला कळले. त्याला काळजी वाटू लागली की आपण आटल्यावर हे श्रान्त पान्थ कोठे बरे जातील? त्यांची तृषा कोण बरे शमवील? त्यांचा गृष्मताप कोण निवारण करील? या काळजीने त्याचे निःश्वास उष्ण उष्ण होऊ लागले. तो आणखी आणखी आटत चालला. पार काळजीने खंगला.' किती सुंदर चित्र! आपणापुढे तो जलाशय साकार होतो. त्याची शीर्ण काया दिसते. परोपकाराच्या चिंतेने निघणारे त्याचे निश्वास आपणांस ऐकू येतात आणि हळूहळू त्या जलाशयाच्या जागी आपले सर्वस्व परांसाठी वेचणारा आणि यापुढे परोपकार करता येणार येणार नाही म्हणून अंतकाली झुरणारा 'संत' उभा राहतो.

असो. जगन्नाथ हा संस्कृतचा शेवटचा कवि. भासाच्या काली आपल्या मोहिनीने भुवनास मोहविण्यास आरंभ करणाऱ्या विदग्ध संस्कृत कविताकामिनीचा हा शेवटचा विलास. या विलासात दर्शन देण्यास ही दोन हजार वर्षांची कामिनी प्रवृत्त झाली तेव्हा तिने संपूर्ण आत्मविश्वासाने पदक्षेप केला की मी रसिकांना मोहवीनच मोहवीन. आणि हा विचार त्या चिरनूतन रमणीने सार्थ केला. म्हणून जगन्नाथ म्हणतो, 'मधुबिंदु, वारुणी, अमृत अथवा कान्तेचा ओठ यांची माधुरी कळत नाही असा कोणी असू

शकेल; पण जगन्नाथाची कविता वाचून ज्याचे मन आनंदाने मोहून जात नाही असा जीवन्मृत कुठे कोण आढळेल बरे ? '





# माघ

## कविता कामिनीचे पांडित्य

**क्षणे क्षणे यन्नवतामुपैति । तदेव रूपं रमणीयतायाः ।।**

**तू माझी माउली । मी तुझ वासरू ।।**
**नको पान्हा चोरू । कृष्णाबाई ।।**

अथवा

**येग येग विठाबाई । माझे पंढरीचे आई ।।**

या ओळी कानावर पडताच त्यातील रम्य भावनेची आर्तता ज्याला प्रतीत होत नाही असा कोणी रसिक असू शकेल काय ? त्यांना रसिक म्हणावे की न म्हणावे हा प्रश्न अलग ठेवला तर असेही महाभाग असतात. त्यांच्या दृष्टीने ह्या भावगर्भ मधुर ओळी म्हणज काव्य नव्हेच. काव्य कसें दणदणीत हवें.


**श्रीकण्ठेंद्राद्यमरपरिषद्सेव्य गंगाप्रवाही ।**

अथवा

**वंशी नादनटी तिला कटितटी ठेवोनि पोटी पटी ।**

असे यांना काही सापडले की हे आनंदाने बेहोष होऊन जातात. काव्य काव्य म्हणतात ते हेच असे त्यांचे मत असते. मोरोपंतांच्या काव्य-सागरातील,

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38890 वि: 
क्रमांक 9422



रुक्मिणी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३८८७२ दि.
क्रमांक १५८२



माघ

दलाल आर्ट स्टुडिओ प्रकाशन

**देव तुझा कैवारी शुद्धे प्रेमे तुझ्याचि वळला गे ।।**
**दे धेनु दुग्ध धावुनि वत्सा इतरा तदर्थ बळ लागे ।।**

अशा अर्थानें ओथंबलेल्या रचना डावलून हे महाभाग,

**अनलसमोहितसाधीरायावारामहीवराकामा ।।**
**अनलसमोहितसाधीरायावारामहीवराकामा ।।**

अशी शब्दकोडी घेऊन त्यांच्याशी कसरत करीत बसतात. अशा लोकांकडून काव्याच्या स्वरूपाबद्दल दिशाभूल होत जाऊन त्यामुळे शेवटी काव्याचेच नुकसान होते.

प्रत्येक भाषेच्या इतिहासात घडणाऱ्या या गोष्टी संस्कृत भाषेच्या इतिहासातही घडल्या. भारवीचे किरातार्जुनीय हे काव्य प्रसिद्ध झाल्यावर त्याच्या आस्वादकात असे काही पंडित निघाले की त्यांनी त्या काव्यामागची प्रेरणा, त्याचा आशय याकडे दुर्लक्ष करून त्यात दिसणाऱ्या पांडित्याचा उदो उदो चालविला. याचा परिणाम काव्याचा अपकर्ष आणि पांडित्याचा प्रकर्ष होण्यात होऊन त्यातून माघ या कवीचा उदय झाला. रघुवंश, कुमारसंभव, किरातार्जुनीय, शिशुपालवध आणि नैषधीय ही जी पाच संस्कृत महाकाव्ये, त्यातील शिशुपालवधाचा माघ हा कर्ता होय. खुद्द शिशुपालवध काव्य आणि त्याचा जयघोष चालविणारे माघाचे भक्त यांनी ही गोष्ट सिद्ध केली आहे की शाब्दिक कसरती आणि पांडित्य या बाबतीत भारवीवर वरचढ होण्यापेक्षा दुसरी कोणतीहि प्रेरणा माघासमोर नव्हती. प्रत्यक्ष माघच, मी हे काव्य पूर्वीच्या महाकवीची कीर्ति लुबाडण्याच्या दुराशेने लिहिले, अशी कबुली आपल्या काव्यात देत आहे. त्याचे भाटहि ' जोपर्यंत माघ मास आला नाही तोपर्यंत रवीचे किरण (रवि-भा) प्रखर असतात. माघाचा उदय झाला की भारवी गळाठलाच ' असे उद्गार काढून हेच सिद्ध करतात. माघ मासातील थंडीच्या प्रभावाने भारवीसारख्या माकडांचे पाय आखडले असेही या पंडितांनी म्हटले आहे. कालिदासाच्या उपमा, भारवीचा अर्थगौरव इत्यादि गुणांचा समुदाय म्हणजे माघ हेही वचन प्रख्यात आहे. असा आक्रोश चालू असता या पंडितांना विसर पडला होता की कालिदासाने उपमांसाठी, अथवा भारवीने अर्थगौरवासाठी काव्यरचना केली नव्हती. तर त्यांनी अंतःप्रेरणेने ही रचना केली असून

त्यात त्यांचे व्यक्तित्व शैलीच्या रूपाने प्रकट झाले होते. केवळ सुपारी खाल्ल्यामुळे मनुष्य लोकमान्य टिळक होत नाही याचा जसा अनेकांना आज विसर पडतो तसाच माघ कवीला पडला. त्यामुळे पूर्वकवींच्या वृत्तांहून अधिक वृत्ते, पूर्वकवीच्या उपमांहून अधिक उपमा, अधिक श्लेष यांचा वापर मी करणार अशा ईर्षेने माघ रचनेस बसला. नायक व नायिका यांचाच शृंगार वर्णन करण्याची पूर्वकवींची प्रथा तर माघाने एक सबंध सैन्य आणि त्यातील बायका यांचा शृंगार वर्णिला. प्रत्येक बाबतीत माझे अधिक ही प्रतिज्ञा त्याने शेवटी पुरी केली, आणि हिरेमाणकांच्या जडावाने डोळे दिपविणारी कृती तयार केली. काही काळ साहित्यविश्व थक्क होऊन माघ म्हणजे कवी आणि कवी म्हणजे माघ असे समीकरण उत्पन्न झाले.

पण पंडिताचा गदारोळ संपून जेव्हा रसिक लोक या काव्याचा आस्वाद घेऊ लागले तेव्हा त्यांचा मेंदू हलला तरी हृदय डोलेना. नयन दिपले तरी ओलावेनात. चंदनाचा देव्हारा, सोनियाचे नंदादीप, हिरीयांची पुष्पे, पाचूचे दूर्वांकुर यांचा झगझगाट आहे खरा पण ती देवमूर्ती कुठे आहे हेच त्यांना दिसेना. साधी तुळशीची मंजिरी भक्तिभावाने विनम्र होऊन देवावर वाहताना जे भावतरंग उठतात ते या अलोट वैभवाच्या आतषबाजीत उठेनात.

दुर्योधनाच्या वैभवाने मन क्षणभर बावचळले तरी भारतीय मनाला शेवटी विदुराच्या कण्याच रुचावयाच्या. अभ्यासकांनी भारवी आणि माघ यांचे काव्य अंशाअंशांनी अभ्यासून भारवीशी चढाओढ हीच माघाची प्रेरणा हे सप्रमाण सिद्ध केले. भारवीला झाकळून टाकले असा डौल मिरविणारा माघ हळू हळू मागे पडत कविमालिकेत आपल्या योग्य स्थानावर येऊन बसला. महाकवी व्हावयास आवश्यक अशा अनेक गुणांनी संपन्न असूनही केवळ प्रेरणा चुकली यामुळे माघाची अशी अवस्था झाली.

याचा अर्थ शिशुपालवध काव्य त्याज्य आहे असा मुळीच नाही. पानोपानी ते रम्यतेने खचून भरलेले आहे. जी क्षणोक्षणी नवा प्रत्यय आणून देते तीच रमणीयता या माघाच्याच व्याख्येप्रमाणे ते काव्य जिवंत नसले तरी रमणीय खासच आहे.

माघाचे सर्वश्रेष्ठ वैशिष्टय म्हणजे त्याने आपल्या काव्यामध्ये अपरंपार शब्दसंपत्तीचा आणि शक्य त्या सर्व व्याकरणप्रयोगांचा उपयोग केला आहे. माघाचे नुसते नऊच सर्ग वाचले तर संस्कृत भाषेत नवा शब्द शिल्लक राहात नाही असे सुभाषित आहे. म्हणून माघ हा कविताकामिनीचे पांडित्य होय.

असा हा पंडित माघ गुजराथमध्ये सातव्या शतकात होऊन गेला. श्रीवर्मल या गुजराथच्या राजाचा सर्वाधिकारी सुप्रभदेव याचा माघ हा नातू. दत्तक हे याच्या वडिलांचे नाव. आजोबा, पिता आणि पुत्र हे तिघेहि मोठे उदार दाते होते.

माघाबद्दलही दंतकथा आहेच. एका दंतकथेप्रमाणे तो धारचा राजा भोज याच्या वैभवास नाके मुरडून आपल्या घरी परतला. राजवैभवास हसणाऱ्याचे वैभव पाहू तरी म्हणून भोजाने त्याला भेट दिली. तेव्हा काय विचारावे ? राजाचे सारे सैन्य याच्या उत्तुंग सुवर्णमंदिरात मावले. तेथे सोन्याच्या फरशा, पाचूचे खांब, चंद्रकांत मण्यांच्या बिछायती होत्या. उन्हाळयात शीतोपचार आणि हिवाळयात उष्णोपचार याची सामग्री सज्ज होती. ती पाहून भोज थक्क आणि तृप्त झाला.

दुसऱ्या दंतकथेप्रमाणे माघाने आपले धन दानात लुटले आणि तो दरिद्री झाला. तेव्हा त्याने ‘शिशुपालवध’ काव्य लिहून भोजाकडे पाठविले. भोजाने त्यातील एकाच अक्षराची किंमत एक लक्ष केली. पण तेहि धन दानात लुटून माघ शेवटी उपासमारीने मृत्यु पावला.

या दंतकथा संपूर्ण असत्य होत. कारण भोजराजा हा माघानंतर चारशे वर्षांनी झाला आहे. पण कालिदासाच्या दंतकथा स्त्रीविषयक आहेत, भारवीच्या दंतकथा विचारशीलतेबद्दल आहेत, जयदेवाच्या दंतकथा कृष्णभक्तीबद्दल आहेत यात जसा सखोल अर्थ आहे तशाच माघाच्या दंतकथा लाखांच्या उलाढालीच्या आहेत यालाही अर्थ आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम.................... वि: ..................
क्रमांक .......................... नों दि ...............

# श्रीहर्ष

## कविता कामिनीचे वैभव

**जातौ न वित्ते न गुणे न कामः ।**
**सौंदर्य एव प्रवणः स वामः ।।**

एकदा काश्मीरच्या न्यायदरबारी दोन बायका एकमेकींच्या झिंज्या खेचीत आल्या. त्यांनी जलाशयावर मारामारी करून एकमेकींची डोकी फोडली होती. व आता त्या न्यायासाठी आल्या होत्या. न्यायाचे काम सुरू झाल्यावर राजाने साक्षीदाराची चौकशी केली, तेव्हा कळले की हे भांडण झाले तेव्हा तेथे एक ब्राह्मण बसलेला होता. त्या ब्राह्मणाला सभेत बोलावून त्याची साक्ष काढली तेव्हा तो म्हणाला,

"मी परदेशी आहे. मला या बायकांची भाषा कळत नाही. पण त्यांच्या मुखातून जे ध्वनी निघाले ते मी आपणास ऐकवितो." म्हणून त्याने खांडगाळच्या शिव्यांची एक प्रदीर्घ मालिका अस्खलितपणे धडाधड म्हणून दाखविली. त्यामुळे योग्य तो न्याय झालाच, पण त्या पंडिताची ती प्रचंड धारणाशक्ती पाहून राजा आश्चर्याने मूढ झाला आणि त्याने त्या पंडिताचा अपूर्व सत्कार केला.

धारणेचा आणि पर्यायाने पांडित्याचा हा प्रचंड सागर म्हणजे शेवटचे संस्कृत महाकाव्य जे 'नैषधीयचरित' त्याचा कर्ता हर्ष हा होय. नैषध-

काव्यातील बुद्धिवैभवाचा विस्तार एवढा अफाट आहे की त्याला तुलनाच नाही. यात श्लोकामागून श्लोक असे आहेत की टीकाकारांना त्यांचे सहा सहा अर्थ सुसंगतपणे लागतात. खुद्द हर्षाच्या मनात किती अर्थ असतील ते त्याचे तोच जाणे. माघाचा गौरव करणाऱ्या पंडितांना गुंगवून हर्षाने त्यांची तृप्ती केली एवढेच नव्हे तर बुद्धी तुम्ही कुठवर चालविता ते पाहतो म्हणून त्यांना नामोहरम केले, आणि शेवटी नैषध काव्य हे विद्वानांच्या बुद्धीची खाज शमविणारे औषध आहे अशी कीर्ती संपादिली.

सुदैवाची गोष्ट अशी की तो पांडित्याच्या खटपटीस बसल्यामुळे हे काव्य निर्माण झाले नव्हते, तर डोळ्यासमोर जो इतिहास घडत होता त्याने हेलावल्या हृदयातून हे काव्य स्फुरले होते. त्यामुळे पांडित्याच्या जंजाळात गुंगूनही या 'मधुर सुधाधारा' अशा काव्याची सजीवता अभंग राहिली. नको त्या प्रसंगाच्या गुंफणीत तो महाकाव्याच्या नियमासाठी अथवा पांडित्यप्रदर्शनासाठी पडला नाही. मनाची पकड घेऊन बसलेले कथानक रंगविण्यासाठी पूरक असेच प्रसंग घेऊन त्यांच्यावर त्याने आपली करामत दाखविली. त्यामुळे ज्या मानवी सुखदु:खांच्या लाटांवर आंदोलने खात रसिकाचे मन काव्याशी समरस व्हावयाचे त्याचा अविरत प्रवाह या काव्यातून वाहत राहिला.

ज्या इतिहासामुळे हर्षाचे मन हालून त्याच्या मनात या काव्याचा अंकुर स्फुरला तो इतिहास म्हणजे पृथ्वीराज आणि संयोगिता यांचे रोमहर्षक स्वयंवर होय. संयोगितेचा पिता जयचंद राठोड याच्या दरबारी हर्ष हा राजकवी होता. पिढ्यान् पिढ्या त्याचे पांडित्य इतके विख्यात होते की त्याला दरबारात दोन विड्यांचा मान होता. हर्षाने आपल्या ग्रंथांची विस्तृत यादी दिली आहे. हे सर्व राजवर्णनपर असून आता उपलब्ध नाहीत. अशा फालतू राजस्तुतीत याचा वेळ जात असता संयोगितेचे भारतभूचा इतिहास बदलणारे स्वयंवर झाले. आणि हर्षाच्या काव्य वल्लीला आगळे फूल येण्याचा योग जमून आला.

हर्ष हा जयचंदाचा आश्रित असला तरी स्वयंवरप्रसंगी त्याने दाखविलेला आडमुठेपणा हा हर्षाला स्तुत्य वाटला नसावा. हर्षाची सहानुभूती संयोगितेलाच असावी. या काव्यातील सुविख्यात मध्यस्थ जो हंस

त्याची व्यक्तिरेखा (की पक्षिरेखा) हर्षाने इतक्या बोलक्या शब्दांनी रेखाटली आहे, व दमयंतीच्या प्रीतीच्या छटा त्याने इतक्या सहृदयतेने आणि सजीवतेने रेखाटल्या आहेत की पित्याचा विरोध असलेल्या संयोगितेला त्याने पुरेपूर जाणून घेतले असावे आणि नळदमयंतीचा मध्यस्थ जो हंस त्याची भूमिका पृथ्वीराज-संयोगिता यांच्या स्वयंवरप्रसंगी केली असावी असे वाटते.

सर्व पंचमहाकाव्यात नैषधीय काव्य हे जसे वैभवाने तसेच विस्ताराने प्रचंड आहे, आणि तरीही ते अपुरे आहे. या काव्याचे एकशेवीस सर्ग व्हावयाचे होते. त्यातील फक्त बावीसच उपलब्ध आहेत. एकशेवीस ही अतिशयोक्ती असे मानावयाची जरूर नाही. हर्षाचे सामर्थ्य इतके प्रत्यय-कारी आहे की त्याला एकशेवीस सर्ग लिहिणे मुळीच अशक्य नाही. भार-ताच्या स्वातंत्र्याचा अस्त करणारी जी घोर आपत्ति शहाबुद्दीन घोरीच्या रूपाने, या स्वयंवरातून भारतावर ओढवली त्याच आपत्तीत हे लिहिलेले काव्य नाश पावले असावे अथवा खुद्द हर्षच देशोधडीस लागून लिखाण अपुरे राहिले असावे. आहे या स्वरूपातच हे काव्य भारतीय साहित्यास भूषणभूत आहे. ते पूर्ण होते तर विश्वसाहित्यास खास भूषणभूत होते.

जगन्नाथ पंडिताचा रसगंगाधर हा अपूर्ण ग्रंथ जसा त्याच्या दिगंत कीर्तीस साधन झाला तसाच हर्षाचाही हा अपूर्ण ग्रंथ त्याच्या असाधारण कीर्तीस साधन झाला. गमतीची गोष्ट म्हणजे हर्षालाही जगन्नाथाप्रमाणे आपल्या सामर्थ्याची पूर्ण जाणीव होती. तो म्हणतो, " तरुणीच्या मस्तीची रुची मर्द मनुष्यच जाणतो. त्या बलधन मर्दाप्रमाणे जे बुद्धिमान पंडित असतील त्यांसाठी माझे काव्य आहे. लटपटित लोकांनी या काव्याच्या वाटेस जाण्याचे धाडस करू नये, ते चीत होतील. समर्थ व्युत्पन्नांसाठीच माझे काव्य आहे. "

हर्ष कुणाचीही पत्राज ठेवत नाही. प्रत्यक्ष भगवान बुद्धाची रवानगी त्याने पातकाचा काळा झगा घालून फिरणाऱ्या कलीच्या सैन्यात केली आहे. यावेळी बुद्धाचा पाडाव झाला असला तरी या थोर पुरुषाबद्दल असे उद्गार काढावयास शंकराचार्यासारख्यांचीच निडरता हवी. ती हर्षाने दाखविली आहे.

हर्षाच्या व्युत्पन्नतेचा एवढा पसारा या ग्रंथात आहे की त्याने स्पर्शिलेल्या विषयांचा उल्लेख करणे सुद्धा इथे मर्यादेत बसणार नाही. त्याचा दुसरा खास गुण म्हणजे या प्रकांडपंडितास विनोदाचे मुळीच वावडे नाही हा होय. खुसखुशीत विनोद तर त्याने केलेच. पण प्रसंगी ग्राम्यता करतानाही त्याने आपले सोवळे सांभाळलेले नाही. स्वयंवराच्या पंक्तीस जेवणाऱ्या शाकाहारी ब्राह्मणांच्या पानात याने मांसासारखे दिसणारे शाकाहारी पदार्थ वाढलेले आहेत आणि त्यांची झालेली कुचंबणा दिलखुलासपणे वर्णिली आहे. नळाच्या एका दासीच्या पायावर त्याने किडा सोडला आहे. आणि तिच्या पायांवर चढत चढत तो भलतीकडे गेल्यावर भरसभेत उडालेली तिची धांदल पाहून हा धृष्टपणे खिदळला आहे.

हर्षाची कल्पनाशक्ति अचाट आहे. उदाहरणे किती द्यावयाची ? नळाचा प्रखर प्रताप आणि शीतल यश पाहून विधात्यास वाटले, आपण सूर्य-चंद्र निर्मिण्याचे कष्ट उगाच घेतले. तेव्हा त्यांना अडगळीत टाकण्यासाठी विधात्याने त्याच्या भोवती वाटोळी खूण केली. तेच सूर्य-चंद्राचे खळे होय असे हर्ष म्हणतो. इंद्र, अग्नि, वरुण व यम हे देव दमयंतीच्या स्वयंवरासाठी येतात आणि नळालाच आपला मध्यस्थ म्हणून दमयंतीकडे पाठवितात. देवाची अनुल्लंघ्य आज्ञा पार पाडणाऱ्या नळाची स्वार्थनिरपेक्ष बिनतोड वकिली पहा,

" नळ मिळाला नाही तर मी जीव देईन असे तू म्हणतेस. पण मरून तू देवांच्या हातातच जाणार. अग्नीत उडी टाकलीस तर आयतीच अग्नीला मिळशील. जलात गेलीस तर वरुणाला मिळशील. फास लावलास तर अंतरिक्षाचा स्वामी इंद्र त्यास मिळशील. आणखी कसाही जीव दिलास तर यमाला मिळशील. तू हे विसरतेस की इंद्राकडे कल्पवृक्ष आहे. त्याच्याकडे इंद्राने तुझी मागणी केली की तू त्याला मिळणारच. वरुणाकडे कामधेनू आहे. ती काय वरुणाची इच्छा पुरविणार नाही ? अग्नीतर दुनियेस वाटेल ते फळ देतो. तुझे फळ का त्याला दुष्कर आहे ? तू स्वयंवर करणार म्हणतेस. स्वयंवराची देवता शची. तू इंद्रास नाराज केल्यामुळे ती कोपली तर स्वयंवर पडणार कसे ? अग्नि कोपला तर तो तुझ्या विवाहास साक्ष कसा राहाणार ? वरुणाने स्तंभन केले तर कन्यादानाचे

उदक सुटणार नाही. मग ? इ."

या वकिलीस दमयंती बिचारी काय उत्तर देणार बरे ? त्या साठी नैषधीय चरितच वाचावयास हवे.

हंस दमयंतीकडे गेल्यावर दमयंती त्याला पकडू पाहाते. तेव्हा हंस तिला म्हणतो, "वेडे मी स्वर्गीय हंस. मला एक नळच पकडू शकेल." हे उत्सुकता जागृत करणारे तोंड त्याने विषयास फोडले. आणि विषयाचा समारोप कसा ? "तू आपले स्वयंवर ठरवून घे बाई. नाहीतर दुसरीच कुणीतरी त्याला गाठील आणि मग तुझी पंचाईत !" दूत असावा तर असा.

आणि कथाही असावी तर अशी. रघुनाथ पंडिताने मराठीत रचना करताना या कथेला सुधेची मधुर धारा असे म्हटले आहे. हर्षाने या कथे-भोवती मयसभेस लाजवील असे वैभवशाली मंदिर उभारले आहे. खरो-खर हर्ष हा शारदेचे वैभव होय.



मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम 38890 ...... वि:
क्रमांक 9402 ...... नों:

# इति अलम्

हा वाग्यज्ञ इथे समाप्त झाला. अपार अशा संस्कृत साहित्यातील ज्या ललित साहित्यकार अशा कविकुलभूषणांना पाश्चात्य पद्धतीच्या अभ्यासात उजाळा मिळण्याचे भाग्य लाभले त्यातील बहुतेकांचा अल्प परिचय या लेखमालेत झाला आहे. ज्यांचा समावेश झालेला नाही त्यात रत्नावलीकर्ता हर्षवर्धन आणि दशकुमारचरितकर्ता दण्डी हे प्रमुख होत. लेखमालेचे स्वरूप ठरल्यावर त्यांचा समावेश न करणे उचित वाटले. कारण हे ग्रंथकार भूषणे आहेत असे मला वाटत नाही.

प्रतिभेचा उमाळा असंह्य झाला आणि हर्षवर्धनाच्या कलाकृती जन्म पावल्या असे दिसत नाही. पूर्वकवींच्या नाटकातील प्रसंग उचलूनही हर्षवर्धनाने त्यांची बूज राखलेली नाही. याची एकदोन उदाहरणे देऊ. शाकुंतलातील भुंग्याच्या नाट्यमय प्रसंग हर्षवर्धनाने उचलला. पण एका भुंग्याचे त्याने शेकडो भुंगे करून त्याची परिणती रम्य परिचयात करण्याऐवजी एका क्षणात अपरिचित नायक-नायिकांच्या दृढालिंगनात करून टाकली. भासाच्या स्वप्नवासवदत्त नाटकातील दोन बायकांचा दादला असण्याचा प्रसंग त्याच पात्रांसह हर्षवर्धनाने उचलला. भासाने या प्रसंगातून पतीच्या प्रेमाची उदात्तता आणि दोन्ही बायकांची गुणवत्ता यांचा समन्वय साधून उच्च पातळीवर नाट्याचा उत्कर्ष साधला तर हर्षवर्धनाने हिच्याकडे तिची निंदा असल्या प्रकारात त्या पतीस गुंतवून शेवटी साष्टांग लोटांगण घालण्याच्या थिल्लरपणात त्या प्रसंगाचा हास्यास्पद शेवट केला.

हर्षवर्धनाचा शृंगारही असाच हास्यास्पद झाला आहे. एका ठिकाणी तो म्हणतो की या शयनावर तिचे ताठर स्तन आणि पुष्ट नितंब यांच्या खुणा उठलेल्या आहेत. वस्तुतः हे अवयव देहाच्या उलट सुलट बाजूस असल्याने त्यांच्या खुणा एकाच वेळी शयनावर उठणे अशक्य होय. अन्यत्र तो म्हणतो, छातीशी आवळल्यामुळे दोन ठिकाणी जळलेले हे कमलपत्र पाहिले की तिच्या हृदयातील प्रेमाची प्रखर धग मला कळण्याऐवजी तिच्या स्तनांचा आकार किती मोठा आहे हेच मला कळून येते. प्रेमाच्या शारीरिक-तेचा इतका नागवेपणा अन्यत्र दिसून येणार नाही.

हास्यास हर्षवर्धनानें हास्यास्पद बनविले असले तरी त्यात नवल नाही, कारण करुण रसासही त्याने हास्यास्पद बनविले आहे. नायक मृत्यू पावल्यावर त्याचे मातापिता आणि पत्नी आत्मदहनास निघतात. तेव्हा रडणाऱ्या सुनेस सासू म्हणते की "तुझ्या अश्रूंनी हा तिकाटण्यावरचा अग्नी विझत आहे, तेव्हा क्षणभर तुझे अश्रू थांबव बरे?' या उद्‌गारातून सूचित होणारा प्रसंग कल्पिणे आणि त्याचा रसास्वाद घेणे मला अजून शक्य झालेले नाही.

हर्षवर्धनाच्या कलासामर्थ्याच्या निकृष्टतेचे एक ठसठशीत प्रतीक म्हणजे तीन नाटके लिहूनही हर्षवर्धन एकही नाव घेण्याजोगे सुभाषित निर्मू शकला नाही. जिथे बुडी मारली असता कालिदासाच्या हाती मूठभर मोत्ये लागतात तिथे हर्षाच्या हाती काहीही लागत नाही. अनोळखी स्त्रीची अभिलाषा होताच कालिदासाचा नायक म्हणतो, "सज्जनांसमोर संदेह उत्पन्न झाला असता त्यांनी अंतःकरणाच्या प्रवृत्ति प्रमाण मानाव्या." अशाच प्रसंगी हर्षवर्धनाचा नायक म्हणतो, "अविवाहित मुलीकडे कोणीही खुशाल पहावे. त्यात दोष नाही." हर्षवर्धनाच्या कृती निकृष्ट आहेत याचा निकाल तेव्हाच लागला आहे. या हर्षवर्धनाच्या की बाणाच्या असा वाद निघाला तेव्हा त्या कमकस असल्यामुळे हर्षवर्धनाच्या ठरल्या. हर्ष-वर्धनाची सम्राट म्हणून जी महत्तम थोरवी आहे ती आपणास इथे अप्रस्तुत आहे.

राजा आणि साहित्यिक अशा दोन भूमिकातील हर्षवर्धनाची दुसरी भूमिकाच आपण पाहिली. दण्डीचीही अशीच स्थिति आहे. साहित्यशास्त्र-

कार आणि साहित्यिक अशा त्याच्या दोन भूमिकातील दुसरीचा आपणास विचार करणे आहे. पदलालित्यासाठी विख्यात असलेला त्याचा ‘दशकुमार-चरित’ हा ग्रंथ म्हणजे परस्परांशी असंबद्ध अशा कथांची एक मोट आहे. या कथा सुद्धा, व्यभिचारासाठी केलेली खुनापर्यंतची पातके, जुगार, चोऱ्या, मारामाऱ्या, असत्य इत्यादि हीन गोष्टींनी बुजबुजल्या आहेत. स्थल, काल, व्यक्ती, स्वभाव यांपैकी कसल्याहि सुसंगतपणाचे वारेही दंडीस लागलेले नाही. गुलबकावलीकर्त्यास मानसशास्त्राची जेवढी जाणीव आहे तेवढी दंडीला नाही. दंडीच्या कथेचा ओघ पुढीलप्रमाणे आहे. “राजपुत्र मृत्यू पावल्यावर मी त्याच्या पत्नीस घेऊन संरक्षणासाठी पळत होते. एवढ्यात शबरांनी आमच्यावर हल्ला केला. त्यातून राजपत्नी कशीतरी निसटली. इतक्यात एका भयंकर वाघाने तिच्यावर उडी मारली. तेव्हा तिच्या हातातील मुलगा खाली पडला व जवळच एक गाईचे प्रेत होते त्याआड रांगत रांगत गेला. तोच एक शिकारी येऊन त्याने वाघाचा वध केला व मुलास बरोबर नेले. मग एका गुराख्याने येऊन राजपत्नीस उचलले व .... इ. इ.” अशी दशकुमाराची कथा चालते. हिच्या वेडगळपणाला जगात तुलना असलीच तर ती हिंदी बोलपटांच्या कथानकांत मिळावयाची.

अभिजात संस्कृत वाङ्मयाच्या महासागराला शृंगाररसाचे भरते नेहमीच आलेले असले तरी त्यात एका अक्षराचीही अनीती कोठे आढळणार नाही. ही सारी अनीती बोकॅशिओसही लाज वाटावी अशा खुल्या दिलाने दंडीच्या ग्रंथामध्ये खिदळत आहे. एका कथेमध्ये दंडी हा नितंबवती या सुशील नायिकेस फसवून स्मशानात नेतो व पातकी जाराकडून चाकूने तिच्या गुप्त भागी जखम करतो. या जखमेच्या पुराव्यावर तो जार तिला घरातून उठविण्यात यशस्वी होतो व तिचा उपभोग घेतो. या कथेला दंडीने नाव दिले आहे ते “प्रज्ञेने दुष्कर गोष्टीही साध्य होतात” असे आहे. धन्य ती कथा ! धन्य तो शृंगार ! ! धन्य ते तात्पर्य ! ! !

असे हिणकस कलाकारही आपल्या साहित्यात मान्यता पावले. कारण आपल्याकडे साहित्याचा जो अभ्यास झाला त्यातील अभ्यासकांची वृत्ती नेहमीच कालदृष्टचा आणि कलादृष्टचा चिकित्सक राहिली नाही, असे दुर्दैवाने म्हणावे लागते. जगातील कोठच्याही जुन्यात जुन्या साहित्य-

शास्त्राशी टक्कर देईल अशी साहित्यशास्त्राची प्रगती आपणाकडे झाली असूनही अनेकदा चुकीचे मूल्यमापन झाले आहे. या मूल्यमापनामुळे जुन्या परंपरेने ज्या दंतकथा मागे ठेविल्या आहेत त्या एकूण एक ऐतिहासिक दृष्टीने साफ असत्य आहेतच; पण कलादृष्टीनेही त्यांचा स्वीकार आंधळे-पणाने करणे फार धोक्याचे आहे. पुष्कळदा या दंतकथांमध्ये शब्दचमत्कृती, अर्थचमत्कृती अथवा एकादा श्लेष याहून अधिक अर्थ नसतो.

दंतकथा अर्थशून्यतेची कमाल कशी करतात याची एक दोन उदाहरणे देतो. एका कथेप्रमाणे शारदा दंडीवर संतुष्ट होऊन म्हणाली,–‘ कविर्दण्डी न संशयः–दंडी हाच कवी होय यात शंका नाही.’ त्यावर कालिदास म्हणाला– ‘ कोऽहं रण्डे–हे रांडे मी कोण ? ’ दंडी आणि रंडी या शब्दांवर चमत्कृती करण्यासाठी ही दंतकथा प्रसृत करून, शारदेस उद्देशून कालिदासाच्या तोंडी ‘ रंडी ’ असा शब्द ज्याने घातला त्या महाभागास काय म्हणावे बरे ? आणि शारदेस ‘ रंडी ’ म्हणण्याचे सामर्थ्य कालिदासामध्ये होते असा याचा अर्थ लावणाऱ्या आम्हांसही काय म्हणावे ?

दुसरी दंतकथा म्हणते वाल्मीकि जन्मास आला तेव्हा कवि शब्दाचे कविः हे एकवचन जगास ज्ञात झाले. व्यास जन्मला तेव्हा कवी हे द्विवचन ज्ञात झाले. आणि दंडी जन्मला तेव्हा कवयः हे अनेकवचन ज्ञात झाले. या महाभागाच्या मते सीतामाउलीच्या अपमानासाठी रावणाचा वध करणारा वाल्मीकि हा पहिला कवी. द्रौपदी सतीच्या अपमानासाठी महा-भारत घडविणारा व्यास हा दुसरा कवी आणि सुशील कुलस्त्रीच्या गुप्त भागी अकारण सुरीने जखम करणारा दंडी हा तिसरा कवी. झाले. भारता-तले कवी संपले. या मूल्यमापनास काय म्हणावे ? आजच्याप्रमाणे तेव्हाही साहित्यिकांचे चेले असावे व ते आपल्या दैवताविषयी वाटेल ती मते प्रकट करून जनतेची दिशाभूल करीत असावे.

त्यामुळे या दंतकथांतील मूल्यमापन स्वीकारण्याअगोदर एकतर स्वतः मत बनवावे लागते. नाहीतर पाश्चात्य चिकित्सकांच्या मताचा आधार घ्यावा लागतो. विल्सन, कीथ, विटरनिट्झ, मॅक्स मुलर इत्यादींच्या आधाराशिवाय आपण एक पाऊलही टाकू शकत नाही ही लाजिरवाणी वस्तुस्थिती आहे. आज आपण आपल्या परंपरेने ठेविलेली दिशाभुलीची

साधने दुर्लक्षावयास हवी. त्याचप्रमाणे आपल्या परंपरेचा परिचय नसणाऱ्या पाश्चात्यांचे निष्कर्षही दुर्लक्षावयास हवे. व आपल्या परंपरेशी त्यांच्या चिकित्सेचा संयोग करून सारा प्रपंच पुन्हा करावयास हवा.

असो. 'दीपावली'चे संपादक श्री. दलाल यांची कृपा झाली आणि त्यामुळे माझ्यासारख्या अपात्र माणसाला या संस्कृत कविकुलभूषणांचा दुरून परिचय घडविण्याची संधी लाभली. मी पंडित तर नाहीच पण जाडा व्यासंगीही नाही. मनाला रिते रिते वाटते तेव्हा या कविश्रेष्ठांशी गुजगोष्टी करून मी विरंगुळा मिळवितो एवढाच यांचा माझा परिचय. पण श्री. दलाल यांचा लोभ हे माझे संचित धन असल्याने त्यांनी आज्ञा केल्यावर तिचे उल्लंघन करणे मला शक्यच नव्हते. मी हे लेख लिहितांना कुठलेही नवे संशोधन केलेले नाही. कारण माझी तशी लायकी नाही. पूर्वी वाचन करताना मनावर जे संस्कार झाले होते, त्यांतून जे उरले, त्यातले स्मरले तेवढे शब्दसाकार झाले आहेत. माझ्यावर संस्कार करणारात प्रा. वाटवे व श्री. काळे यांचा मोठा भाग आहे हे मी कृतज्ञतेने कबूल करतो. अर्थात या लेखमालेत जे उत्तम असेल ते त्यांचे आहे. पण बहुसंख्य ठिकाणी इतरांची मला पटलेली मते मी स्वीकारली असली तरी ती पटली नाहीत तिथे त्याचा स्वीकार मी केलेला नाही. त्यामुळे या मालेचे स्वरूप गुणसंकीर्तन असे न राहिल्यास त्याला निरुपाय आहे. यात रसिकांस न रुचण्याजोगे निकृष्ट जे काही असेल ते माझे असे मानावयाचे. या लेखांकांना जी नावे दिली आहेत ती भास आणि कालिदास या दोन कवींचे जयदेवाने 'भासो हासः कविकुलगुरुः कालिदासो विलासः" असे वर्णन जे केले आहे त्याच्या अनुसरणाने बसविली आहेत.

जे झाले त्याने मी धन्य झालो असलो तरी तुष्ट झालो नाही. कवींचे चरित्र, दंतकथा, साहित्यपरिचय, रसास्वाद सारे अमुकच मर्यादेत बसवावयाचे यासाठी आवश्यक ती कलात्मक कसरत करण्याची माझी पात्रता मर्यादित असल्याने पुष्कळच सांगावयाचे राहून गेले आहे. ते जाणण्याची जिज्ञासा होऊन एकजरी वाचक संस्कृत साहित्याच्या अभ्यासास प्रवृत्त झाला तर श्री. दलालांच्या मनोकमलातून स्फुरलेली गंधमयी इच्छा आणि माझे श्रम कारणी लागतील.

संस्कृत कवींचे परिशीलन हे पुण्यकर्म असावे असे वाटते. ते तसे नसते तर श्री. दलालांसारख्या मूर्त चित्रकलेचा उपकृत होण्याचे भाग्य मला न लाभते. त्यांच्या चित्रांशेजारी माझा लेख म्हणजे भरजरी पाटोळ्यास पटकुराचे बासन होय. मोठमोठे अधिकारी समीक्षक हाताशी असता ही सेवा करण्याची संधी मला देण्याचा जो अनुग्रह त्यांनी आपणहून केला त्याचे स्मरण ही माझी एक प्रबल जीवनधारा राहील.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 3८८९० वि: निबंध
क्रमांक ९५८२ नों. दि.



REFBK-0013733